|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ४५ सोमवार दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## दीरासोबत जुळले वहिनीचे प्रेम दोघांनी मिळून केला पतीचा गेम

जालना : क्राईम रिपोर्टर

शारीरिक आकर्षणातून अनैतिक संबंध निर्माण होतात. पण आजकाल व्याभिचाराचे हे घाणेरडे प्रकार चार भिंतीच्या आठी सुरु आहेत. माणूस शरीर सुखासाठी इतका बहकला आहे कि त्याला नात्या गोत्याचाही विसर पडला आहे. त्यातूनच समाजात इन्संट सेक्सचे प्रकार वाढलेत जे अत्यंत घृणास्पद आहेत. जालना जिल्ह्यातील सोमठाणा येथे एका विवाहितेची तिच्या दिरासोबतच अनैतिक संबंध होते. मात्र याची कुणकुण तिच्या ...पान २ वर

## दारुड्या मुलाकडून नात्याची राखरांगोळी झाली आई-वडिलांची हत्या करून आत्महत्या केली

चिखली : क्राईम रिपोर्टर









दारूचे व्यसन इतके भयानक असते कि एकदा का माणूस दारूच्या आहारी गेला कि दारूसाठी तो कुठल्याही थराला जाऊ शकतो. अशावेळी त्याला दोस्ती यारी किंवा नात्यागोत्याची सुद्धा पर्वा नसते. त्याला फक्त आणि फक्त दारूसाठी पैसे हवा असतो. आणि कोणत्याही मार्गाने पैसे मिळवण्याची त्याची तयारी असते. दारूचे व्यसन जोवर मर्यादित असते तोवर ठीक असते, पण कोणताही कामधंदा न करता माणूस जेंव्हा दारूच्या आहारी जातो आणि २४ तास दारूच्या नशेत राहू लागतो. तेंव्हा मात्र त्याचे आयुष्य संपलेले असते. असा माणूस कुटुंबासाठी एक प्रकारची डोकेदुखी असते. त्यामुळे त्याचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर तो कुटुंबातील लोकांसाठी कधीही घातक ठरू शकतो. यापूर्वी दारूसाठी काहींनी चोऱ्या केलेल्या आहेत. ओळखीच्या माणसांवर हल्लेही केलेले आहेत. दारूसाठी अगदी कुटुंबातील लोकांनाही संपवले आहे. तर काही ठिकाणी अशा दारुड्या माणसाला कुटुंबातील लोकांनीच कायमचे संपवले आहेत. शेवटी दारूमुळे माणूस केवळ स्वतःचेच नुकसान करीत नाही, तर कुटुंबाचेही नुकसान करतो. दारुड्या माणसाला एक दिवस जरी दारू मिळाली नाही तरी तो वेड्यासारखा होतो. आणि दारूसाठी घरातील सामानसुमान विकतो. अगदी बायकोच्या गळ्यातील पवित्र मंगळसूत्र सुद्धा ठेवत नाही. अशावेळी तिने विरोध केल्यास तिचा जीव घ्यायलाही तो मागेपुढे पाहत नाही. इतकी त्याची वाईट अवस्था झालेली असते. बुलढाणा जिल्ह्याच्या चिखली तालुक्यातील सावरगाव डुकरे येथे अशीच एक भयंकर घटना घडली आहे. या गावात राहणाऱ्या विशाल डुकरे याला दारूचे व्यसन होते. तो या व्यसनाच्या इतका आहारी गेला होता कि दारूसाठी घरातील सामान कपडे भांडी आणि इतरही विकायचा दरम्यान वडिलांनी आणलेले शेतीचे सामानही त्याला विकायचे होते. पण आई वडिलांनी विरोध करताच विशालने वडील सुभाष डुकरे आणि आई लताबाई डुकरे यांच्यावर कुऱ्हाडीचे घाव घालून त्यांची हत्या केली व त्यानंतर स्वतःही गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण बुलढाणा जिल्हा हादरला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

जन्मदात्या आईवडिलांची मुलाने झोपेत असताना कुऱ्हाडीने घाव घालून हत्या केली. त्यानंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. ही भयंकर आणि तितकीच हृदय हेलावून टाकणारी घटना चिखली तालुक्यातील सावरगाव डुकरे येथे बुधवारी रात्री घडली. गुरुवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर बुलढाणा जिल्हा हादरला आहे. सुभाष डिगांबर डुकरे (६०) व लताबाई सुभाष डुकरे (५५) असे हत्या करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर विशाल सुभाष डुकरे (३५) या मारेकरी मुलाने आईवडिलांना ठार मारल्यानंतर आत्महत्या केली. दारूच्या आहारी गेलेल्या विशालने क्रूरकृत्य केल्याने जिल्हाभर संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, तिघांच्याही मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सावरगाव डुकरे हे एक आदर्श गाव आहे. सुभाष हे शेतकरी होते. त्यांना शरद व विशाल ही दोन मुले आहेत. दोघांचेही लग्न झाले ...पान ६ वर

## बॅनरलावण्यावरून वाद झाला सुनीलने मोहितचा खून केला





धुळे : ललित खरे

राजकारणात येणारे तरुण प्रसिद्धीसाठी हपापलेले असतात. लोकांनी आपल्याला ओळखावे आपली कामे लोकांपर्यत पोहचावी आणि त्यातून समाजात आपली ओळख निर्माण व्हावी यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु असतात. त्यासाठी पोस्टरबाजी, बॅनरबाजी सुरु असते. मात्र याच बॅनरबाजी मधून वाढी निर्माण होतात. नंदुरबार शहरातील सिद्धिविनायक चौकात बॅनर लावण्यावरून मोहित राजपूत आणि सुनील राठोड यांच्यात वाद होता. याच वादातून त्यांच्यात हाणामारीची झाली होती आणि एकेफिवशी राठोडने आपल्या साथीदारांच्या मदतीने मोहित राजपूतची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.



सध्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहेत. त्यासाठी शासकीय यंत्रणाही तयारीला लागली आहे. त्याचबरोबर निवडणूक लढवू इच्छिणारेही गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होत आहेत. त्यासाठी काहीतरी निमित्त साधून अर्थातचस्वतःच्या अथवा इतरांच्या वाढदिवसांचे, सणावाराचे निमित्त साधून गावातील, शहरातील मुख्य चौकात, मोक्याच्या जागेवर आपले बॅनर लावण्यासाठी, आपली छबी लोकांसमोर येण्यासाठी स्पर्धा सुरू झाली आहे. नंदुरबार जिल्हाही त्यासाठी अपवाद नाही. आता जो-तो उठतो आणि आपली छबी लोकांच्या नजरेत आणण्यासाठी बॅनरबाजी करतो. ...पान २ वर

## जत्रेतील वाद त्याच्या प्राणावर बेतला गावगुंडांनी रिक्षाचालकाचा जीव घेतला

धुळे : क्राईम रिपोर्टर



आजकाल माणसाला छोट्या छोट्या गोष्टीवरून राग येतो आणि याच रागातून पुढे कोणताही अनुचित प्रकार घडू शकतात कारण काही लोक छोट्या वादालाही मोठा मानून सूड घेण्यासाठी तापून बसलेले असतात. वेळाने गावातील विकास महाले हा नाशिकला रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा. तसेच अधून मधून गावी यायचा यावेळी तो जत्रेसाठी गावी आला होता. पण जत्रेतील आकाश पाळण्यात बसण्याच्या रांगेत विकास आणि गावातील एका झाला पुढे गावातील लोकांनी हा वाद मिटवला. पण विकासबरोबर ज्याचा वाद झाला तो सुडाने पेटलेला होता. त्यामुळे नारळी पौर्णिमेला विकास आपल्या कुटुंबातील लोकांना भेटण्यासाठी येताच त्याचा सूड घेण्यासाठी टपून बसलेल्या गावगुंडांनी त्याच्यावर हल्ला करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विकास हा घरातील कमावणार एकटाच असल्याने त्याच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

धुळे जिल्ह्यातील धुळे तालुक्यातील शिरूड परिसरातील वेल्हाणे नामक गावात विकास श्रावण महाले नावाचा तरूण ...पान २ वर

## आईवरची शिवीगाळ महागात पडली दोघांच्या हातून मित्राची हत्या घडली

सांगली : क्राईम रिपोर्टर



मैत्रीचे नाते किती जरी घट्ट असले तरी दारूच्या नशेत कुणी काही चुकीचे बोलला आणि एखाद्याला त्याचा राग आला कि माणूस मैत्री वैगेरे बघत नाही. अशावेळी रंगाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. आणि जेंव्हा मित्रांमध्ये दारूच्या पार्ट्या होतात. तेंव्हा त्या पार्टित काहीना काही कारणावरून वाद होतात. आणि हे वाद जर मिटले नाहीत वाढतच गेले, तर काहीही घडू शकते. सांगलीच्या हनुमान नगरमध्ये अशाच एका घटनेत दारू प्यायला बसलेल्या तीन मित्रांमध्ये एकाने दुसऱ्या दोघांना आईवरून शिवीगाळ गेली, त्याचा त्या दोघांना इतका राग आला कि त्यांनी रात्रीच्या अंधारात संधी साधून आईवरून शिव्या देणाऱ्या मित्राची निर्घृण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





अमर रावसाहेब कुन्नरे हा सांगलीतील हनुमान नगर परिसरात आपल्या कुटूंबासह राहयला आहे. तो सांगली शहरातीलच काळी खण असलेल्या कुरणे याच्या घोडयाच्या तबेल्यात गेल्या काही वर्षापासून कामाला आहे. त्याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो आपल्या मित्राबरोबर कायम तबेल्यात आणि बाहेर दारू प्यायला बसत होता.तो दारू पित असल्याने त्याला त्याच्या घरचे लोक आणि तबेल्याचा मालक ही ओरडत होते. काही ...पान २ वर

## ऊसतोड मजुराची शोकांतिका झाली पत्नीचा जीव घेऊन आत्महत्या केली



सांगोला : क्राईम रिपोर्टर

एखाद्याकडून जेंव्हा आपण कामाचे पैसे घेतो तेंव्हा त्याचे काम करणे आवश्यक असते. पण काही लोक पैसे घेऊनही काम करीत नाहीत, समोरच्याला फसवत असतात. आजकाल वीटभट्टीवर काम करणारे मजूर तसेच ऊसतोड कामगार हे मुकादमाकडून उचल घेतात. पण कामावर जात नाहीत. सांगोला येथील समाधान चव्हाण या ऊसतोड मजुराने ऊसतोडणीसाठी मुकादमाकडून काही पैसे घेतले होते. पण त्यांच्या ऊस तोडणीच्या कामाला न जाता लपून बसला होता. त्यामुळे ज्यांच्याकडून त्याने पैसे घेतले होते ते लोक समाधानाला त्रास देत होते. त्यामुळे वैतागलेल्या समाधानाने पत्नीची हत्या करून स्वतःही आत्महत्या केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

ऊस तोडणी कामगार पतीने पत्नीचा साडीने गळा आवळून खून केला आणि त्यानंतर ऊस तोडणी मुकादामाच्या ...पान २ वर

## धक्का लागल्याचा राग जीवघेणा ठरला आकाशसिंग जीवनाची बाजी मात्र हरला




डोंबिवली : क्राईम रिपोर्टर

गर्दीच्या ठिकाणी एखाद्या माणसाला दुसऱ्याचा धक्का लागतोच, पण धक्का लागला म्हणून एकमेकांशी वाद घेलने आणि त्यावरून हाणामारी करणे योग्य नाही. पण आजकाल लोकांना छोट्या छोट्या गोष्टीवरून राग येतो आणि त्या रंगाची परिणीती मोठ्या वादात होते. डोंबवलीत अशाच एका घटनेत हॉटेलमध्ये शिरताना एका इसमाचा दुसऱ्याला धक्का लागला. या छोट्याशा गोष्टीवरून वाद झाला आणि या वादात एकाला जीव गमवावा लागला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

डोंबिवली एमआयडीसीतील मालवण किनारा हॉटेलमध्ये प्रवेश करताना एका तरूणाचा दुसऱ्या ग्राहकाला धक्का लागला. या विषयावरून चार जणांनी धक्का देणाऱ्या इसमाशी वाद घातला. त्याला हॉटेल बाहेर बोलावून शिवीगाळ करत मारहाण करत, चाकूने वार करत त्याचा खून केला. या घटनेने डोंबिवलीत खळबळ उडाली आहे. या ग्राहकाला मारहाण करणारे चार अनोळखी इसम होते. खून केल्यानंतर ते फरार झाले. ते २५ ते ३५ वयोगटातील होते. असे ...पान २ वर

## संशयावरून संसाराची वाताहत झाली निर्दयी पतीने पत्नीची निर्घृण हत्या केली

कल्याण : क्राईम रिपोर्टर

तसे पाहता आजकाल समाजात व्यभिचार बळावलेला आहे. त्यामुळे कोण सज्ञन आणि कोण दुर्जन याचा अंदाज लावणे कठीण झाले आहे. एखाद्याचा सुखाचा संसार सुरु असताना अचानक दोघांच्या संसारात तिसऱ्याची एंट्री होते आणि संसारात वादळ निर्माण होते. अशा वादळातून काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. मात्र काही वेळा विनाकारण पती पत्नीमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते आणि हा संशयसुद्धा जीवघेणा ठरू शकतो. कल्याण जवळच्या वरपमध्ये अशाच एका घटनेत चारित्र्याच्या संशयावरून पटीने पत्नीची हत्या करून स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने तो बचावला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

कल्याण जवळील कल्याण-मुरबाड रस्त्यावरील वरप गाव हद्दीत एका उच्चभ्रू अलिशान सोसायटीत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने धारदार शस्त्राने पत्नीची गुरूवारी हत्या केली. पत्नीला ठार मारल्यानंतर पतीने स्वतावर धारदार शस्त्राने वार करून करून आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न केला. त्याची प्रकृती चिंताजनक आहे. त्याच्यावर उल्हासनगर येथील मध्यवर्ति रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विद्या संतोष पोहळ (४०) असे मृत पत्नीचे नाव आहे. संतोष पोहळ (४१) असे मारेकरी पतीचे नाव आहे. हे जोडपे टिटवाळा पोलीस ठाणे हद्दीतील कल्याण मुरबाड रस्त्यावरील ...पान ६ वर

## अनैतिक संबंधाची अखेर पकडली चोरी पत्नीने तोडली पतीच्या आयुष्याची दोरी



अमरावती : क्राईम रिपोर्टर

अनैतिक संबंध कधी लपून राहत नाहीत ते कधीना कधी उघडकीस येतात. जेंव्हा हे संबंध उघडकीस येतात तेंव्हा समाजात बदनामी होत असते. समाजात होणारी बदनामी टाळण्यासाठी काही लोक टोकाचा निर्णय घेतात. अंजनगाव बारी येथे सासुरवाडीत राहणाऱ्या एका इसमाची त्याच्याच पत्नीने प्रियकराच्या मदतीने हत्या केली. घराचे काम करण्यासाठी आलेल्या मेस्त्री सोबत तिचे सूतजुळले होते. मात्र दोघांच्या अनैतिक संबंधाची माहित तिच्या पाटील लागताच तो तिला त्रास देऊ लागला आणि त्याच्या याच त्रासाला कंटाळून पत्नीने प्रियकराच्या मदतीने त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

अमरावती येथील तरुणाच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी धक्कादायक खुलासा केला आहे. तरुणाची पत्नी वर्षभरापूर्वी घराची डागडुजी करण्यासाठी आलेल्या मिस्त्रीच्या प्रेमात पडली. अनैतिक प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा काटा काढण्यासाठी तिने प्रियकरासोबत मिळून कट रचला होता. भररस्त्यात पतीचा खून काढण्याचा प्लॅन आखला होता. अखेर पोलिसांनी पत्नी आणि तिचा प्रियकर अशा दोघांनाही या प्रकरणी अटक केली आहे. अमरावतीतील हनुमान गढी ते भानखेडा रोडवरील जंगल परिसरात १२ नोव्हेंबरला रात्री एका तरुणाचा मृतदेह आढळला होता. ४२ वर्षीय प्रमोद बकाराम भलावी यांच्या ...पान ६ वर

17 TO 23 NOVEMER 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/15/2025 8:34 PM Page 1



पान १ वरून...

## दीरासोबत जुळले वहिनीचे प्रेम...

पाटील लागताच घरात भांडणे होऊ लागली. अखेर त्या महिलेने आपल्या दिराच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीना अटक केली आहे.

विश्वासाच्या पायावरच कोणतंही नातं उभं असतं मग ते मित्र-मैत्रीणीचं असो, भावा-बहिणीचं किंवा पती-पत्नीचा एकदा का विश्वास मोडला तर नात्याला तडा जायला क्षणभराचाही वेळ लागत नाही. प्रेमात पडलेला माणूस काहीही करू शकतो असं म्हणतात, पण हे प्रेम दुसऱ्यासाठी जीवघेणं ठरलं तर मग खूप पंचाईत होते आणि जीवन उद्ध्वस्त होतं. असंच काहीसं जालन्यातल्या सोमठाणा गावातही घडलं. पती-पत्नीचा सुखाचा संसार सुरू होता, मात्र दीराच्या रुपाने त्यात तिसऱ्या व्यक्तीची एंट्री झाली आणि हसता-खेळता संसार क्षणात मोडला. वहिनीशी प्रेमप्रकरण आणि अनैतिक संबंधातून एका इसमाने त्याच्याच सख्ख्या भावाची हत्या केली आणि त्या मृतदेह धरणात फेकून दिला. धक्कादायक गोष्ट म्हणजे यामध्ये मृत व्यक्तीच्या पत्नीनेही दीराची साथ दिली आणि खुनात मदत करत मृतदेहाची विल्हेवाट लावून टाकली. अनैतिक प्रेम संबंध मध्ये अडथळा येत असल्याने मागच्या महिन्यात १५ ऑक्टोबर रोजी डोक्यात कुऱ्हाडीने वार करून इसमाचा खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करून मृतदेहची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेह गोणीत भरून तलावात फेकला होता. मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत या गुन्ह्याची उकल केली असून बदनापूर पोलिसांनी मृत व्यक्तीच्या भावाला आणि पत्नीला अटक केली. जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यातील सोमठाणा गावातून ही धक्कादायक घटना समोर आली. प्रेम प्रकरणामधून सख्या भावानेच आपल्या वहिनीच्या मदतीने मोठ्या भावाचा खून केला. मिळालेल्या माहितीनुसार, परमेश्वर राम तायडे असं मृत व्यक्तीचं नाव आहे.

याप्रकरणी बदनापूर पोलिसांनी मृत व्यक्तीच्या भावाला आणि पत्नीला अटक केली असून त्यांना २ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला. तेव्हा मृत व्यक्तीचा लहान भाऊ ज्ञानेश्वर तायडे आणि मृताची पत्नी मनीषा परमेश्वर तायडे यांच्यामध्ये गेल्या काही दिवसापासून अनैतिक प्रेम संबंध असल्याच समोर आला. मात्र परमेश्वर याला हे समजलं आणि त्या दोघांच्या प्रेमसंबंधात त्याचा अडथळा येऊ लागला. म्हणूनच दोघांनी त्याला मार्गातून हटवण्याचा कट रचला. अखेर ज्ञानेश्वर आणि मनीषा यांनी गेल्या महिन्यात १५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री परमेश्वरच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करत त्याचा निर्घृण खून केला. मृतदेहाची विल्हेवाट लावून या खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांनी त्याचा मृतदेह एका प्लास्टिकच्या गोणीत भरला आणि गावालगत असलेल्या वाल्हा येथील धरणात आणून फेकला. मात्र याप्रकरणी मृत व्यक्तीच्या वडिलांनी तक्रार केल्यावर पोलिसांनी तपास सुरू करून गुन्हा उघडकीस आणला. त्यानंतर बदनापूर पोलीस ठाण्यात पत्नी आणि लहान भावावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना बेड्या ठोकण्यात आल्या, त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## बॅनरलावण्यावरून वाद झाला...

नंदुरबार शहरातील जे काही महत्त्वाचे चौक आहेत त्यात सिद्धीविनायक नावाचा चौक आहे. या चौकातील महत्त्वाच्या जागेवर आपला बॅनर लावण्यासाठी नंदुरबार शहरातील उदयोन्मुख नेतृत्व म्हणून ज्याच्याकडे पाहिलं जात आहे आणि ज्याच्या मागे सत्कार्य करणाऱ्या तरूणांची फौज आहे, त्यात मोहित मदन राजपूत हा उमदा तरूण आग्रही आणि अग्रेसर होता. याच चौकात म्हणजे सिद्धीविनायक चौकात त्याच जागेवर आपले बॅनर लावण्यासाठी सुनिल ज्ञानेश्वर राठोड हा युवकही आग्रही होता. त्याच्यामागेही सळसळत्या रक्ताच्या तरूणांची फौज असल्याने सुनिल राठोड बॅनर लावण्यासाठी आपला हक्क अग्रेसर करत होता. स्वतःचे बॅनर लावण्यासाठी मोहित मदन राजपूत आणि सुनिल ज्ञानेश्वर राठोड हे दोघेही प्रयत्नशील होते.खरं तर बॅनर लावण्यासाठी विशेषतः सार्वजनिक जागा शासनाने काही नियम केले आहेत. सार्वजनिक ठिकाणी बॅनर लावायचे असल्यास संबंधित ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची अधिकृत शुल्क भरून लेखी परवानगी घेणंअनिवार्य आहे. परंतु शासनाचे, ग्रामपंचायतीचे, नगरपरिषदेचे आणि महानगरपालिकेचे सर्व नियम धाब्यावर बसवून बॅनर लावले जातात, त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो. व्यवसाय करणाऱ्यांची गोची होते, शिवाय बॅनर लावण्याच्या कारणास्तव जागेवरून भांडणे होवून परिसरातील शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात येते. मोहित मदन राजपूत आणि सुनिल ज्ञानेश्वर राठोड हे दोघे तरूण, सिद्धीविनायक चौकातील त्या मोक्याच्या जागी आपले बॅनर लावण्यास आग्रही होते, तर त्या दोघांनी शासन, नगरपरिषद आणि पोलीस यंत्रणा याची अधिकृत परवानगी घेतली असती तर संबंधित जागेवरून त्या दोघांमध्ये आपसात वाद झाला असता, एकालाच त्या जागेवर बॅनर लावण्याचा परवानगी मिळाली असती. बॅनर लावण्यासाठी परवानगी न घेता 'त्या' महत्त्वाच्या जागेवर आपलाच बॅनर लागावा म्हणून अट्टाहास होता. कार्यकर्त्यांचाही तोच आग्रह होता, त्यामुळे सिद्धीविनायक चौकात रहाणाऱ्या मोहित मदन राजपूत आणि सुनिल ज्ञानेश्वर राठोड यांनी दोघांनी बॅनर लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे दोघांमध्ये वाद निर्माण झाला. शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले.

सुनिल ज्ञानेश्वर राठोड आणि त्याचे साथीदार मुकेशउर्फ राणा राजपूत, संजय उर्फ पप्पू तलवार, यशवर्धन लुले उर्फ मुन्ना मराठे आणि अनिकेत तवर यांनी संतापामध्ये मोहित राजपूत याच्यावर प्राणघातक हल्ला केला. मोहितला सुनिल आणि त्याच्या सहकाऱ्यांनी घेरून लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाण करतांना मोहितच्या गुप्तांगावर जबरदस्त प्रहार करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच नंदुरबार शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. तत्पूर्वीच पोलीस येत असल्याचा सुगावा लागताच मोहित राजपूत याच्यावर प्राणघातक हल्ला करणारे सुनिल राठोड, मुकेश राजपूत, संजय राजपूत (तलवार), यशवर्धन लुळे (मराठे), अनिकेत तवर यांनी घटनास्थळावरून पलायन केले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांच्या मार्गदर्शनानुसार गंभीर अवस्थेत जखमी असलेल्या मोहित राजपूतला नंदुरबारच्या जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारार्थ नेण्याचा प्रयत्न झाला, पण मोहित राजपूत याची गंभीर अवस्था लक्षात घेता त्याच्या नातेवाईकांनी त्याला औषधोपचारासाठी तातडीने सुरत येथील एका मोठ्या रूग्णालयात नेले. दरम्यान नंदुरबार शहर पोलिसांनी पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळाचा पंचनामा केला व पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण नंदुरबार शहरात सशस्त्र बंदोबस्त तैनात केला. सुरत येथील रूग्णालयात दक्षता विभागात औषधोपचार सुरू असतांना मोहित राजपूत याची प्राणज्योत मालवली. मोहित राजपूतची प्राणज्योत मालवल्याची बातमी संपूर्ण नंदुरबार शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि शहरातील वातावरण तप्त झाले. मोहित राजपूत याच्या सहानभुतीपोटी संतप्त नागरिकांनी नंदुरबार शहर पोलीस स्टेशनला धाव घेतली. मोठ्या संख्येने संतप्त जमाव पोलीस स्टेशन परिसरात जमताच, पोलिसांनी पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता आणि विभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या सुचनेनुसार संबंधित परिसरात मोठा सशस्त्र पोलीस बंदोबस्त तैनात केला. मोहित राजपूत या तरूणावर प्राणघातक हल्ला करून त्याचे प्राण घेणाऱ्या मुख्य आरोपी सुनिल ज्ञानेश्वर राठोडसह इतर सर्व आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा आणि सर्व हल्लेखोरांवर कडक कारवाई करा अशा प्रकारची मागणी संतप्त जमावाकडून होत होती. या संतप्त जमावाला उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील आणि नंदुरबार शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील हे सामोरे गेले व त्यांनी संबंधित सर्वहल्लेखोरांना अटक करून त्यांच्यावर नियमातंर्गत गुन्हे दाखल केले जातील असे संतप्त जमावाला आश्वस्त केले. दरम्यान मोहित मदन राजपूत याचा मृतदेह घेवून रूग्णवाहिका त्य नंदुरबार शहर पोलीस स्टेशनला पोहोचली, तेंव्हा मोहितच्या आई-वडीलांना, पत्नीला शोक अनावर झाला. आपली छाती बडवत त्यांनी आकांत केला. त्यांच्या या आकांताने जमलेल्या जमावाच्या डोळ्यातही पाणी आले. सर्व जण शहारून गेले. मृत मोहित याच्या दोन मुलांना शोकाकुल मदन राजपूत यांनी जमावात उंच धरून या दोघा निष्पाप मुलांनी काय केले? बाल वयात ते आपल्या वडीलांना गमावून बसले. या मुलांचा आधारवड गेला. आमच्या घरातील कर्ता तरूण आम्ही गमावून बसलो. आता आम्ही कुणाकडे बघायचे. तारूण्यात सून विधवा झाली. तिने काय करायचे असे आकांत करत जेंव्हा मदन राजपूत बोलत होते, तेंव्हा संपूर्ण जमाव शहारला होता. वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संयम ठेवत मोहित राजपूत याच्या नातेवाईकांना व संतप्त जमावाला विश्वासात घेवून कायदेशीर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर अतिशय शोकाकुल वातावरणात मोहित राजपूत याच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आला. दरम्यान काही समाजकंटक या घटनेच्या मागे लपून शहरातील शांतता व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करत असल्याचे पोलीस यंत्रणेच्या लक्षात येताच स्वतः पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांनी प्रसार माध्यमांचा आधार घेत संबंधित समाजकंटकांना कडक इशारा दिला. धार्मिक आणि जातीय तेढ निर्माण करून किंवा पक्षीय रंग देवून नंदुरबारची शांतता व सुव्यवस्था धोक्यात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा सक्त इशारा पोलीस अधीक्षक श्रवण दत्ता यांनी दिल्यामुळे पुढील अनर्थ टळला, त्याबद्दल नंदुरबारकरांनी पोलीसयंत्रणेचे आभार मानले.

## जत्रेतील वाद त्याच्या प्राणावर बेतला...

आपल्या आडदांडपणामुळे पूर्ण गावात प्रसिद्ध, पण आपल्या आई-वडीलांची, बहीणींची उदरनिर्वाहाची जबाबदारी आपणावर आहे याची जाणीव झाल्याने विकासला कष्ट करून पैसे कमावण्यांची उपरती झाली. वेल्हाणे गावामध्ये राहिलो तर आपल्या संगतीतील आपले सवंगडी आपणांस कंष्टाने पैसे कमावण्यास अडथळे ठरू शकतात हे हेरून विकास महाले आपल्या नातेवाईकांच्या मदतीने नाशिकला गेला. तेथे तो रिक्षा चालवूनआपला आणि आपल्या आई-वडीलांचा उदरनिर्वाह करू शकेल एवढे पैसे कमावू लागला. विकास महाले नाशिकला एकटाच रहात होता. रिक्षा चालवून मिळवलेले पैसे तो प्रसंगानुरूप सणासुदीला तो आपल्या आई-वडीलांना पाठवत असायचा. आई-वडीलांना भेटण्यासाठी आणि त्यांच्यासोबत दोन दिवस रहाण्यासाठी वेल्हाणे गावी येत असायचा. गेल्या नारळी पौर्णिमेला रक्षाबंधनाचं औचित्य साधून विकास महाले वेल्हाणेला आला होता. परंपरेनुसार दरवेळी नारळी पौर्णिमेला वेल्हाणे गावात चांगदेवाची मोठी यात्रा भरत असते. विविध प्रकारच्या करमणुकीच्या साधन सामग्रींच्या दुकानाबरोबर पाळणे, मौत का कुआ, चक्री आदी खेळणीसुद्धा या यात्रेत उपलब्ध असतात. चांगदेवाचे दर्शन घेवून यात्रेतील आनंद लुटण्यासाठी विकास महाले यात्रेत फिरत असतांना त्याला पाळण्यात बसण्याची इच्छा झाली, त्यासाठी तो रांगेत उभा राहिला. रांगेत उभा राहून नंबरप्रमाणे तो ज्या पाळण्यात बसणार होता, त्या पाळण्यात विकासला धक्का देवून गावातील दुसरा तरूण बसू लागला. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होण्याआधी गावातील समंजस लोकांमुळे वांद शमला आणि दोघेजण वेगवेगळ्या मार्गांनी आपआपल्या घरी जाण्यासाठी मार्गस्थ झाले. दोन दिवसांनी विकास नाशिकला निघून गेला. कारणपरत्वे उद्भवलेला वाद गावातील समंजस लोकांच्या मदतीने शमल्याने विकास तो प्रसंग विसरून गेला होता. राखी पौर्णिमेनंतर विकास महाले दीपावली साजरी करण्यासाठी दि. २० ऑक्टोबर २०२५ रोजी सोमवारी वेल्हाणे गावात आला. दीपावलीसाठी लागणारा किराणा वगैरे घरी आणून दिल्यानंतर रात्री विकास आपल्या मित्रांसह गावातील देवमढीत गप्पा-गोष्टी करत बसला होता. विकास आपल्या मित्रांसह गप्पात रंगला असतांना गावातील सात-आठ आडदांड तरूण हातात लाठ्या-काठ्या, लोखंडी सळ्या घेवून विकास श्रावण महाले या तरूणावर चालून आले. विकास महाले हा बेसावध होता. गेल्या राखी पौर्णिमेला चांगदेव यात्रेतील पाळण्यात बसण्याच्या जागेवरून ज्या तरूणांबरोबर विकासचा वाद झाला होता तो मारेकऱ्यांच्या अग्रभागी होता. देवमढीत आपल्या मित्रांसोबत गप्पा-गोष्टी करण्यात रंगलेल्या विकासवर अचानक सात तरूणांनी प्राणघातक हल्ला केल्याने विकास हतबल झाला. तो एकटाच होता व त्याच्यावर प्राणघातक हल्ला करणारे सात-आठ जण होते. ते विकासला संपवण्याच्या इराद्यानेच आले असावेत, कारण या सर्वांनी एकाचवेळी विकासवर चहुबाजूने मारहाण केली. ही मारहाण इतकी जबरदस्त होती की विकास जागेवरच कोसळला. विकास कोसळताच सर्वांनी घटनास्थळावरून पोबारा केला. विकास जीवाच्या आकांताने विव्हळत होता. त्याला उपचारार्थ वेल्हाणे गावातील लोकांनी धुळे येथील शासकीय जिल्हा रूग्णालयात दाखल केले. विकासची गंभीर अवस्था लक्षात घेता त्याच्यावर युद्धपातळीवरून उपचार सुरू केले, पण विकासला झालेली मारहाण जबरदस्त व चौफेर होती. त्याच्या मेंदूला, गुप्तांगाला, हृदयाला, पोटाला झालेली मारहाण इतकी गंभीर होती की उपचार चालू असतांनाच त्याची प्राणज्योत मालवली. विकास श्रावण महाले हा आपल्या कुटुंबातील एकटाच कमावणारा होता. आई-वडील आणि बहीणींची जबाबदारी त्याच्यावर होती. विकास आडदांड होता, पण स्वतःहून कुणाचीही कुरापत काढून त्रास देत नसे. गेल्या काही दिवसांपासून तो व्यवसायानिमित्त नाशिकला स्थायिक होता. प्रसंगानुरूप वेल्हाणेला येवून परत नाशिकला जायचा. त्याचा गावाला कुठलाच उपद्रव नव्हता, त्यामुळे त्याच्या निधनाची वार्ता गावात येताच गावाचे वातावरण तंग झाले होते.

घटनेची माहिती मिळताच तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील हे आपल्या फौजफाट्यासह वेल्हाणे गावात पोहोचले. दक्षता म्हणून त्यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गावात चोख बंदोबस्त ठेवला. पोलीस बंदोबस्तातच विकास महाले यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. किरकोळ कारणास्तव मागील भांडणाचे निमित्त करून विकास महाले याच्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर त्वरीत गुन्हे दाखल करा अशा प्रकारची मागणी गावाच्यावतीने पोलीस यंत्रणेला करण्यात आली आहे.ऐन दिवाळीत दिवाळी सण साजरा करण्यासाठी आलेल्या विकास महालेच्या मृत्यूमुळे गावात शोककळा पसरली.

## आईवरची शिवीगाळ महागात...

झाले तरी त्याचे दारूचे व्यसन काही कमी झाले नाही. सांगली शहरातील वखार भाग परिसरातील मलिक दस्तगीर मुल्लांनी आणि काळी खणी जवळ राहणाऱ्या निशान भीमसेन दासुद याच्याबरोबर त्याची चांगली मैत्री होती. ते दोघे ही अमर बरोबर कायम दारू प्यायला बसत होते. दारू पित असताना त्याचेत नेहमी चेष्टामस्करी होत होती. पण त्याचे कुणी जास्त मनावर घेत नव्हते. मैत्रीत शिवीगाळ झाली नाही तर ती मैत्री कसली असा प्रश्न बऱ्याच वेळेला विचारला जातो. त्यामुळे बऱ्याच मित्रात एकमेकांना शिवी देण्याचा प्रकार घडत असतो. तसे त्या तिघांच्या बाबत ही होत होते. दारू पित असताना त्याच्यात चेष्टामस्करी होत असल्याने त्याकडे फारसे कुणी लक्ष देत नव्हते. परंतु अलिकडे मलिक याला अमर याची चेष्टामस्करी खपत नव्हती. तो त्याला मला चेष्टामस्करी करू नकोस असे सांगत होता. तरी ही अमर त्याची चेष्टा करीत होता.कधी कधी त्याची मलिक याच्या जिव्हारी लागत होती. दारू पित असताना मलिक याला अमर हा मुद्दामच शिवीगाळ करीत होता. त्यामुळे मलिक याने तु मला शिवी देवू नकोस तरी ही अमर हा काही तरी कुरापत काढून त्याला शिवी दयायचा. कुरणे याच्या घोड्याच्या तबेल्यात ते दारू प्यायला बसत असल्याने आणि त्या तबेल्याची देखरेख अमर कुन्नरे हा करीत असल्याने त्याचे मित्र ही त्याची ही अरेरावी सहन करीत होते.परंतु अलिकडे अमर याचे चेष्टामस्करी आणि शिवी देण्याचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे निशाद दासुद आणि मलिक मुल्लाणी हे दोघे त्याच्यावर चिडून होते. अमर कुन्नरे हा सांगून ही ऐकत नाही त्यामुळे त्याला एकदा कायमचा धडा शिकवायचा असे त्या दोघांनी ठरविले होते. तशा संधीच्या शोधात ते दोघे ही होते. त्या तबेल्यात अमर कुन्नरे याच्यासोबत त्याचा दुसरा सहकारी ही झोपायला असायचा. त्यामुळे अलिकडे त्या तिघांची ही त्या ठिकाणी दारू पिण्याची अडचण होऊ लागली होती. कुरणे मालकांनी मुद्दामच अमर बरोबर दुसरा गडी त्या तबेल्यात ठेवलेला होता. कारण कुरणे यांनी बऱ्याच वेळेला आपल्या तबेल्यात या तिघांना ही दारू पिऊ नका असे सांगितले होते. तरी ही अमर हा त्या दोघांना घेऊन त्या ठिकाणी दारू प्यायला बसत होते. ही माहिती अमर याच्या दुसऱ्या सहकार्याने मालक कुरणे यांना दिलेली होती. त्यामुळे हल्ली कधी कधी ते तिघे ही त्या ठिकाणी दारू प्यायला बसत होते. बहुतेक वेळा ते तिघे ही बाहेर कुठे तरी निर्जन स्थळीच दारू पिण्यास बसत होते. शनिवार दि. ८ नोव्हेंबर २०२५ रात्री अमर आणि त्याचे मित्र मलिक आणि निशाद हे तिघे ही दारू प्यायला एकत्र प्यायला बसले. त्यावेळी त्याच्यात कुठल्या तरी वेगळ्याच कारणाने वादा वादीला सुरूवात झाली. सुरूवातीला त्याच्यातील वाद चेष्टामस्करी वाटत होती. परंतु जसा वाद वाढत गेला तसा त्याच्यातील शिव्या ही वाढत गेल्या.ते तिघे ही एकमेकांना शिवी गाळ करीत होते. शिवी देत असताना दारूच्या नशेत असणाऱ्या अमर कुन्नरे यांने त्या दोघांना ही त्याच्या आईवरून अशिल्ल शिवीगाळ केली.याचा राग मलिक आणि निशाद यांना आला. ते दोघे ही अमर याच्या अंगावर त्याला मारायला गेले. परंतु तुम्ही माझ्या अंगावर आला की मी तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी त्याने त्या दोघांना दिली. त्या तिघांना ही दारूची नशा फुल्ल झालेली होती. नशेत कुणी काय बडबडत आहे.कोण कोणाला कसल्या शिव्या देत आहे हे कोणालाच काही समजत नव्हते. त्या तिघांत हाणामारी होणार परंतु मलिक याने त्याला मी तुला असा सोडणार नाही तु मला आईवरून शिवी देतोस काय म्हणत तुझे तुकडेच करतो अशी धमकी दिली.त्यावेळी दारूच्या नशेत असणाऱ्या अमर याने त्या दोघांना ही जा जा मी असल्या पोकळ धमक्याना घाबरत नाही असे म्हणत परत त्या दोघांना आईवरून शिवी दिली. आता याला सोडयाचे नाही असे म्हणत ते दोघे ही तेथून निघून गेले.त्याला मारण्याचा त्यांनी प्लॅन केला. अमर कुन्नरे हा रात्री झोपयला घोडयाच्या तबेल्यात असतो हे त्या दोघांना ही माहित होते. तो तबेल्यात झोपला असताना त्याचेवर धारदार एडक्याने वार करीत त्याला संपविण्याचा त्या दोघांनी विचार केला. रात्री बारा ते एक वाजणेच्या सुमारा पर्यत ते दोघे ही त्याच्या पाळतीवर होते. त्या रात्री अमर बरोबर तबेल्यात त्याचा दुसरा साथीदार नितीन बाळु जाधव हा ही झोपायला होता. त्यामुळे अमर याला मारण्याचा त्याचा प्लॅन फिस्कटत होता. तरी ही दोघे तबेल्याच्या बाहेर दबा धरून बसले होते. त्यातच नितीन जाधव हा अर्ध्या तासाने लघुशंकेसाठी बाहेर गेला. तो त्या तबेल्या पासून काही अंतरावर गेला त्याच वेळी ही संधी साधत मलिक आणि निशाद हे दोघे ही तबेल्यात दबक्या पावलांनी गेले.

तबेल्यात अमर कुन्नरे हा दारूच्या नशेत गाढ झोपला होता. त्याला झोपलेला बघून मलिक याने आपल्याकडील एडक्याने अमर कुन्नरे याच्यावर सात वार सपासप केले. हे वार अमर याच्यावर छातीवर डोक्यावर आणि गळ्यावर केल्याने अमर हा रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडला. त्याचे ओरडण्याने बाहेर गेलेला नितीन जाधव हा पळत तबेल्याकडे आला. त्याने अमर याच्यावर दोघेजण हल्ला करीत असल्याचे बघुन त्याने ही बोंब ठोकली. त्याच्या आवाजाने मलिक आणि निशाद हे दोघेजण अंधारातून पळून गेले. तबेल्यात अमर कुन्नरे याच्यावर कुणी तरी हल्ला करून त्याचा खुन केल्याची माहिती नितीन जाधव याने मालक कुरणे यांना दिली. त्यांनी ही परिस्थितीचे गांर्भिय ओळखत लागलीच तबेल्याकडे आले. नितीन जाधव आणि कुरणे यांनी अमर कुन्नरे याला तातडीने खाजगी वाहनातून उपचारासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटल मध्ये नेले. परंतु गाडीतून त्याला बाहेर काढत असतानाच अमर याने आपला जीव सोडला. सिव्हिल हॉस्पिटलच्या आवारात अमर याच्या मित्रांनी आणि नातेवाईकांनी गर्दी केली होती. डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापुर्वीच मृत्यु झाल्याचे सांगितले. या घटनेची माहिती लागलीच विश्रामबाग पोलीसांना देण्यात आली. पोलीस ही माहिती समजताच तातडीने सांगली सिव्हिल हॉस्पिटल मध्ये दाखल झाले. त्यांनी परिस्थीतीचे गांर्भिय ओळखत गर्दीला पांगवत शांत केले. तसेच पोलीसांनी काळी खण येथील घटनास्थळी जावून घटनेची पाहणी करून पंचनामा करीत घटनास्थळी पडलेला रक्ताने माखलेला एडका जप्त केला. पोलीसांनी या घटनेची माहिती तबेल्यातील नितीन जाधव याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या महितीवरून पोलीसांनी या घटनेतील संशयीताची माहिती मिळाली होती. घटनेच्या आधीचे सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी ताब्यात घेतले. त्या परिसरात मलिक मुल्लांनी आणि निशाद दुसाद हे दोघे फिरत असल्याचे त्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना रविवार सकाळी या घटनेतील मलिक मुल्लांनी याला त्याच्या वखार भाग येथे राहत असलेल्या घरातून ताब्यात घेतले. तर निशाद दुसाद याला स्टेशन रोडवरून ताब्यात घेतले. त्या दोघांना ही पोलीसांनी विश्रामबाग पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता दोघांनी ही नाही होय म्हणत आपल्या गुन्हयाची कबुली देत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्या दोघांनी ही गुन्हयाची कबुली दिल्याने या घटनेची फिर्याद मयत अमर कुन्नरे याचा दुसरा सहकारी नितीन बाळु जाधव याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अमर रावसाहेब कुन्नरे (वय ३२) रा.हनुमान नगर सांगली याच्या खुन प्रकरणी त्याचे मित्र मलिक दस्तगीर मुल्लांनी (वय २८) रा.वखार भाग सांगली आणि निशाद भीमसेन दासुद (वय २०) रा.काळी खाण सांगली याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.या दोघांना ही पोलीसांनी सांगली येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल आणि एकडा जप्त केला. या घटनेचा तपास पो.निरी सुधीर भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नी.चेतन माने, पोलीस उप निरी.प्रवीण कांचन, सतेज कार्वेकर, संदीप सांळुखे, अमर मोहिते, योगेश पाटील, आर्यन देशींगकर आणि सुनिल पाटील यांनी केला. दारूची नशा आणि करी जीवानाची दुर्देशा असे म्हटले जाते.दारू पिल्यानंतर अनेकजण आपले नियंत्रण हरवून बसतात त्यातच शिवीगाळ चेष्टामस्करी झाली की वाद विकोपाला जातो आणि त्यातूनच अशी खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## ऊसतोड मजुराची शोकांतिका झाली ...

त्रासाला कंटाळून स्वतः ही पत्र्याच्या खोलीत लोखंडी अँगलला स्टोलने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी रात्री ९:३०च्या सुमारास कोळे ता. सांगोला येथील कोळे-बानुरगड रोडवरील हांडे वस्ती नजीक घडली. समाधान बबन चव्हाण (वय ३०), अश्विनी समाधान चव्हाण (वय २५) असे मृत पती पत्नीचे नावे आहेत. याबाबत, दादा मोहिते यांनी खबर दिली आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. गुरुवारी त्याने जुनोनी येथील मेव्हणे दादा मोहिते यांच्या मोबाइलवर फोन करून पत्नी अश्विनीस मी कोळे येथे येणार असून, माझे कपडे व जेवण घेऊन ये, असे म्हणाला. तो त्याचा मित्र अश्विनीसह तिघे जण मिळून दुचाकीवरून सायंकाळी ४:३०च्या सुमारास प्रमोद देशमख यांच्या शेतातील वस्तीवर गेले असता, अश्विनीला त्या ठिकाणी सोडले. तिने भाऊ दादा याला 'तू मला एक तासाने फोन कर,' असे म्हणाल्यानंतर ते दोघे जण दुचाकीवरून परत जुनोनी येथे परतले. त्यानंतर, दादाने रात्री ९:३० वाजता समाधान याच्या मोबाइलवर फोन केला असता बंद लागला, म्हणून दादा मोहिते व त्याची आई दुचाकीवरून या ठिकाणी गेले. पत्र्याच्या खोलीचा दरवाजा आतून बंद होता, म्हणून त्यांनी जोराने ढकलला असता, समाधान खोलीतील पत्राच्या लोखंडी अँगलला गळफास घेतल्याचे दिसले, तर अश्विनी ही खोलीतील बेडवर मयत अवस्थेत पडली होती. घटनेची माहिती मिळताच सांगोला पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतांचे पंचनामे केले आणि पुढील तपास सुरु केला. मृत, समाधान चव्हाण याने दोन-तीन मुकादमाकडून ऊस तोडणीसाठी कामावर येतो म्हणून लाखो रुपयांची उचल घेतली होती. पण प्रत्यक्षात तो ऊसतोडणीसाठी न जाता मुकादमांची नजर चुकवून जुनोनी व कोळे परिसरात लपून-छपून राहत होता.

## धक्का लागल्याचा राग जीवघेणा ...

मानपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत तक्रारदाराने म्हटले आहे. आकाश भानू सिंग (३८) असे मृत इसमाचे नाव आहे. ते डोंबिवली पूर्वेतील गोग्रासवाडीतील सरोवर बार जवळील सुरेश पाटील इमारतीत आकाश सिंग राहत होते. आकाश सिंग नवी मुंबईतील कॉल सेंटरमध्ये कामाला होते. आकाश यांचा लहान भाऊ बादल सिंग यांनी या खून प्रकरणी अनोळखी चार जणांच्या विरूध्द मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. डोंबिवली एमआयडीसीतील मालवण किनारा हॉटेल समोरील सार्वजनिक रस्त्यावर हा खुनाचा प्रकार रविवारी रात्री बारा वाजण्याच्या दरम्यान घडला आहे. बादल सिंग यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की मृत आकाश सिंग आणि त्यांचे मित्र हे रविवारी रात्री एमआयडीसीतील मालवण किनारा येथे भोजनासाठी गेले होते. हॉटेलमध्ये प्रवेश करत असताना आकाश सिंग यांचा धक्का त्याचवेळी हॉटेलमध्ये येत असलेल्या आरोपी असलेल्या एका ग्राहकाला लागला. आपणास धक्का का मारला, असे प्रश्न अनोळखी इसम आकाश सिंग यांना करू लागला. यावेळी अनोळखी इसमाने आकाश यांना शिवागीळ करत मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आपला चुकून धक्का लागला. आपण हेतुपुरस्सर धक्का दिलेला नाही, असे आकाश आणि त्यांचे साथीदार अनोळखी इसमाला सांगत होते. पण तो ऐकण्यास तयार नव्हता. त्या इसमाने आपल्या इतर सहकाऱ्यांना हॉटेल मालवण किनारा येथे बोलावून घेतले. या चौघांनी मिळून आकाश सिंग यांना हॉटेलमधून खेचून सार्वजनिक रस्त्यावर नेले. तेथे त्याला बेदम मारहाण करत त्याच्या सर्वांगावर चाकूने सपासप वार करून त्याला जीवे ठार मारले. चारही मारेकरी बेभान झाल्याने आकाशच्या बचावासाठी कोणीही पुढे आला नाही. सुनील कागले यांनी हिम्मत करून आकाश सिंग यांच्या बचावासाठी प्रयत्न केला. पण चारही इसमांनी त्यांच्या गालावर चाकुने वार करून त्यांनाही जखमी केले. या घटनेची माहिती मिळताच मानपाडा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दाखल तक्रारीवरून पोलिसांनी फरार आरोपींचा शोध सुरू केला आहे.

क्राईम Reporter
क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.
9890718873

17 TO 23 NOVEMER 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 11/15/2025 8:35 PM Page 1



# शहापुरात सरकारी धान्याच्या 'काळा बाजारा'चा पर्दाफाश!



## ६९५ क्विंटल तांदूळ जप्त, गोदाम मालकावर गुन्हा दाखल

**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडीच्या शासकीय गोदामातून शहापुर तालुक्यातील अघई येथील रेशन दुकानासाठी निघालेले धान्य काळ्या बाजारात विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी शहापुर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तहसील प्रशासनानेही स्वतंत्र चौकशी हाती घेतली आहे. तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी केलेल्या झाडाझडतीत खासगी गोदामात तब्बल ६९५ क्विंटल तांदूळ जास्तीचा आढळून आला. हा तांदूळ शासनाकडून रेशन दुकानदारांना वितरित होणारा असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संबंधित गोदाम सील करण्यात आले आणि गोदाम मालक रमेश अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडी येथील गोदामातून शहापुर तालुक्यातील अघई येथील रेशनिंगमध्ये जाणारा गहू आणि तांदळाचा तब्बल १६५ क्विंटल धान्याने भरलेला ट्रक शहापुरच्या एका खासगी गोदामासमोर आढळून आला होता. पुरवठा अधिकाऱ्यांनी याप्रकरणी केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी ट्रक व धान्य जप्त करून ट्रक चालक एजाज शहा याला अटक केली असून यातील एक आरोपी फरार आहे. या गंभीर घटनेनंतर पोलीस उपअधीक्षक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहापुर पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला. यामध्ये भिवंडी येथील गोदाम ते शहापुर तालुक्यातील अघई चे रेशन दुकान यामधील साखळी उलगडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणाच्या अनुषंगाने शहापुरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे व पुरवठा निरीक्षण अधिकारी अमृता सूर्यवंशी यांनी ज्या खासगी गोदामालगत धान्याचा ट्रक उभा होता त्या गोदामाची झाडाझडती घेतली. त्यामध्ये धान्याच्या पावत्या प्रत्यक्ष मिल व गोदामा मधील आढळून आलेला साठा यामध्ये तफावत आढळून आली असून ६९५ क्विंटल तांदूळ जादा आढळून आला आहे. तसेच या तांदळामध्ये शासनाकडून वितरित होणारा (एफआरके) तांदूळ निदर्शनास आल्याने राईसमील व खासगी गोदामांना सील ठोकून गोदाम मालक रमेश अग्रवाल यांच्याविरुद्ध पुरवठा निरीक्षक गीतांजली गोरे यांनी तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील धान्याचे गोदाम व रेशनिंग दुकानांची तपासणीचे व त्यामधील गोदामपाल, वाहतूक ठेकेदार, सब वाहतूक ठेकेदार यांच्या चौकशीचे आदेश ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी देऊन गोरगरिबांच्या तोंडचा हक्काचा घास कोणाकडूनही हिरावून घेतला जाणार नाही यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# बिहार भाजप विजयानंतर भिवंडीत जल्लोष साजरा



**भिवंडी : वार्ताहर**

बिहार राज्यात भाजपा संयुक्त जनता दल महायुतीने अभूतपूर्व असा विजय संपादन केला आहे. या विजयानंतर भारतभर भाजपा कार्यकर्त्यांकडून विजयोत्सव साजरा केला जात आहे. भिवंडी शहरातील उत्तर भारतीय समाज मोठ्या संख्येने वास्तव्यास असलेल्या भंडारी कंपाऊंड येथे भाजपा माजी नगरसेवक यशवंत टावरे, भाजपा माजी महिला अध्यक्षा सुनीता टावरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो उत्तर भारतीय नागरिकांसह भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला आहे. यामध्ये महिलांचा सुद्धा मोठा सहभाग होता. एकमेकांना पेढे भरवत ढोल ताशांच्या तालावर अनेकांनी नाच करीत जल्लोष साजरा केला आहे.

# गोसावी वूमेन्स विंगच्या वतीने विद्यार्थिनीला सायकलचे वाटप



**लातूर : वार्ताहर**

येथील गोसावी वूमेन्स विंग या संस्थेने गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदतीचा कार्यक्रम आयोजित केला. हा कार्यक्रम शहरातील हॉटेल अतिथी येथे पार पडला. संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा (मीरा) धर्मवीर भारती आणि उपाध्यक्षा अलका अंबादास गोसावी, रक्षिता गिरी, सुषमा पुरी, जयश्री गिरी, माया पुरी, मीनाक्षी गिरी, मनीषा गोसावी, संगीत गिरी, वैशाली गिरी, वर्षा बन, मनीषा गोसावी, अश्विनी गिरी, रंजना गिरी, डॉ. भागीरथी पुरी, भाग्यश्री गिरी, सुजाता गिरी, मनीषा सागर, मनीषा भारती, पार्वती भारती, सारिका गिरी, निर्मला गिरी, सत्यभामा पुरी, अंजली गोसावी, अश्विनी पुरी, मनीषा पुरी, प्रतिभा बन, अलका गिरी, रोहिणी सागर, संध्या भारती, प्रिया भारती, जयश्री गिरी, लता गिरी, अंजली पुरी यांच्या हस्ते ८वी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या कु. शरयू बालासाहेब गिरी या विद्यार्थिनीला सायकल देण्यात आली. यामुळे तिच्या शिक्षणाच्या प्रवासाला गती मिळणार आहे तसेच इतर अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यात आली.

संस्थेची सुरुवात केवळ १० महिलांनी केली होती, पण आज ती ६५ सक्रिय सदस्यांपर्यंत पोहोचली आहे. महिला सक्षमीकरण आणि समाजसेवेच्या ध्येयाने कार्यरत असलेली ही संस्था दरमहा समाजहिताचे कार्यक्रम आयोजित करते. संस्थेच्या या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी चालना मिळत आहे.

# मिरारोड पोलीस ठाण्यात चार आरोपींचा धूम्रपान करत धिंगाणा

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**





मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील एका महत्त्वाच्या पोलीस ठाण्यात शिस्तीचा भंग झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिरारोड पोलीस ठाण्याच्या एका महत्वाच्या कक्षात ४ आरोपींनी खुलेआमपणे धूम्रपान करत धिंगाणा घातल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल झाली होती. या व्हायरल चित्रफितीत पोलीस ठाण्यासारख्या संवेदनशील ठिकाणीच आरोपींनी अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन केल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. मिरा भाईंदर शहरात घडत असलेल्या विविध घटना समाजमाध्यमांवर सातत्याने व्हायरल होत असतात. सोशल मीडिया इंफ्लुएन्सर, तसेच शहराशी संबंधित पेजेसद्वारे व्हायरल चित्रफिती आणि फोटो नेटकऱ्यांपर्यंत पोहोचत असतात. अशीच एक चित्रफीत शनिवारी प्रचंड व्हायरल झाली होती. यात काहीजण पोलिस ठाण्याच्या एका कक्षात धूम्रपान करत असल्याचे आढळून आले. तर ही चित्रफीत मिरारोड पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल कक्षातील असल्याचे समाजमाध्यमांवर सांगण्यात आले होते. पण, पोलिसांनी केलेल्या खुलाशानुसार ही चित्रफीत मिरारोड पोलीस ठाण्याच्या मुद्देमाल कक्षातील नसून ती पोलीस ठाण्याच्या स्टोर रूममधली असल्याचे स्पष्ट झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मिरारोड पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यांसंबधी चौकशी करण्यासाठी संशयित आरोपींना अटक करण्यात आली होती. तर चौकशीपूर्वी या आरोपींना पोलीस ठाण्यात बसविण्यात आले होते. चार आरोपींना पोलीस ठाण्यात बसवून पोलीस अधिकारी दुसऱ्या आरोपींना आणण्यासाठी गेले. हीच संधी साधून पोलीस ठाण्याच्या आवारात बसलेले चारही आरोपी मिरारोड पोलीस ठाण्याच्या स्टोर रूममध्ये शिरले. त्यानंतर या आरोपींनी स्वतःजवळ असलेल्या सिगारेटी पेटवत धूम्रपान करायला सुरुवात केली. पण हे आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत. तर त्यांनी पोलीस ठाण्याच्या स्टोर रूममध्ये धूम्रपान करत धिंगाणा घालतानाची, नाचतानाची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल केली. ही चित्रफीत व्हायरल होताच नेटकऱ्यांनी विविध प्रकारच्या प्रतिक्रिया देत मिरारोड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. आरोपींनी पोलीस ठाण्यात घातलेल्या धिंगाण्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल होताच पोलिसांनी व्हायरल चित्रफितीतील आरोपींना अटक आहे. तसेच त्यांच्यावर कोटपा कायद्यांतर्गत (Cigarettes and Other Tobacco Products Act) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी जबाबदार असणारे अधिकारी आणि अंमलदारांवर देखील वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई केली जाणारा असल्याचे मिरारोड पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांनी सांगितले आहे.

# देवणी येथील विवेक वर्धिनी विद्यालयात बिरसा मुंडा जयंती साजरी

**देवणी : वार्ताहर**

देवणी येथील विवेक वर्धनी विद्यालयात आदिवासी समाजाचे महानायक समजले जाणारे तत्कालीन समाज प्रबोधनकार बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. सदर प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक तथा प्राचार्य नंदकुमार पटवारी हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक दत्ताजी अचवलकर, अमोल जाधव, जयमाला पाटील, सुनंदा कासले आदिंची उपस्थिती होती. सदर जयंतीनिमित्त वक्तृत्व व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. महानायक बिरसा मुंडा यांच्याविषयी क्रीडा अध्यापक सतिश पाटे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी मयुरे अष्टुरे या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सतिश पाटे यांनी केले तर आभार अविनाश पाटील यांनी मानले. जयंतीनिमित्त सामूहिक आदिवासी गीत साभिनयासह अमोल जाधव व विद्यार्थी यांनी गायिले.



# भोपणीकर परिवाराकडून आकाश म्हेत्रे यांचा सत्कार



**देवणी : वार्ताहर**

तालुक्यातील बोरोळ येथील म्हेत्रे आकाश नामदेव यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून वर्ग-१ पदाला गवसणी घातली आहे, आकाश यांच्या आईवडिलांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून मोलमजुरी करून त्यांना शिक्षण दिल. सोबतच हे यश मिळवण्यामध्ये त्यांना त्यांच्या मोठ्या भावांचाही सदैव पाठिंबा राहिला. सध्या ते राज्यकर निरीक्षक म्हणून माझगाव, मुंबई येथे कार्यरत आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेतून झालेलं असून महाविद्यालयीन शिक्षण विवेक वर्धीनी विद्यालय, देवणी येथे झालं आहे. त्यांचा स्पर्धा परीक्षांचा प्रवासही अतिशय प्रेरणादायी राहिलेला आहे. तब्बल ३१ वेळा वेगवेगळ्या परीक्षांमध्ये अपयश येऊनही न खचता अविरतपणे त्यांनी प्रयत्न चालू ठेवले आणि अखेर राजपत्रित अधिकारीपद मिळवलं. या यशाबद्दल आकाश म्हेत्रे आणि अश्विनी गंगाधर कोयले ही B.A.M.S. ला अहिल्यानगर येथे लागल्याने भोपणीकर परिवाराकडुन दोघांचे पण सत्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते गजानन भोपणीकर, देवणी नगर पंचायतीचे सदस्य प्रा.अनिल इंगोले, कै. रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जावळे पाटील, उपप्राचार्य शिवाजी सोनटक्के, गावातील कालीदास देवणे, दत्ता हुरुचनाळे, शालेय समितीचे अध्यक्ष सत्यदेव गरड, लक्ष्मण बिरादार, श्रीकांत बिरादार, ओम पवळे, सचिन मुळखेडे सह अदिंची उपस्थिती होती.

# अभिजात मराठीचा उदघोष करणारा 'साहित्य जल्लोष' पुढे ढकलला!

**विरार : वार्ताहर**

'साहित्य जल्लोष प्रतिष्ठान' तर्फे आयोजित करण्यात येणार साहित्य जल्लोष हा कार्यक्रम निवडणुकीची आचार संहिता लागण्याच्या श्यक्यते मुळे पुढे ढकलण्यात आला आहे. अगोदर हा कार्यक्रम ७ डिसेम्बरला आयोजित करण्यात आला होता. आता तो फेब्रुवारी मध्ये आयोजित करण्यात येणार असल्याचे जल्लोषचे सचिव संदेश जाधव यांनी सांगितले. हे साहित्य जल्लोषचे ३१वे वर्ष आहे. साहित्य जल्लोष प्रतिष्टान आणि वसई विरार महानगरपालिका संयुक्त विद्यमाने साहित्य जल्लोष कार्यक्रम साजरा करण्यात येतो. यावर्षी पालिकेने आचार संहितेचे कारण सांगून कार्यक्रमाला निधी देण्यास असमर्थता दाखविली आहे. वसईचा सांस्कृतिक वारसा जपतानाच वसईकरना साहित्याची मेजवानी मिळावी. प्रथितयश लेखकाचे विचार त्यांना ऐकायला मळावे यासाठी साहित्य जल्लोषचे आयोजन करण्यात येत असते. या कार्यक्रमातून नव्या पिढीला लेखकांना व प्रथितयश कवींना भेटण्याची ऐकण्याची संधी मिळत असते. तर दुसऱ्या बाजूला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कवितांचे एक वेगळे व्यासपीठ उपलब्ध होत असते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला निघणारी ग्रंथ दिंडी साहित्य संमेलनाची आठवण करून देत असते. सद्या बऱ्याच वर्षपासून रखडलेल्या नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हापरिषद आणि नंतर महानगरपालिकेची निवडणूक असणार असल्याने त्या बाबत आचार संहिता लागण्याची श्यक्यता लक्षात घेऊन ७ डिसेम्बरला होणारा साहित्य जल्लोष हा कार्यक्रम फेब्रुवारी पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याचा निर्णय साहित्य जल्लोषच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'जी' वालीव, विभाग सातिवली**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील मिळकत धारकांनी मालमत्ता धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसाच्या आत लेखी हरकत/ तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार नसल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | सातिवली | SL07/1381 | दुर्गा नागेश्वर कांडरेगुल्ला | मोनिका रुपेश बुजड/ वेणुका नागेश्वर कांडरेगुल्ला |
| २. | सातिवली | SL07/1001 | नंदलाल रामानंदन जस्वाल | असलम अन्सारी अब्दुल जी अन्सारी |
| ३. | सातिवली | SL07/3753 | कैलास जितू मौर्या | उषादेवी कैलास मौर्या |
| ४. | सातिवली | SL07/11714/51 | निळकंठ डेव्हलपर्स | कांजीभाई धरमजीभाई पटेल |
| ५. | सातिवली | SL09/5753/77 | शिलादेवी रामलखन यादव | मिना भागवत कांबळे |
| ६. | सातिवली | SL08/4146 | ज्ञानमती मंतराम पाल | शशीकांत रामनयन यादव |
| ७. | सातिवली | SL09/5753/83 | शिलादेवी रामलखन यादव | विकास हिरामण कोकणे |
| ८. | सातिवली | SL04/8837/26 | साई गणेश रिअलटर्स | आर्चना मांडवकर |
| ९. | सातिवली | SL03/4474 | महेंद्र हंसराज उनडकर/ कुंदन महेंद्र उनडकर | संदेश रामकुमार वर्मा/ सचिन रामकुमार वर्मा |
| १०. | सातिवली | SL07/865 | नझमा रफिक दरवेश | सुवर्णा मारुती चव्हाण |
| ११. | सातिवली | SL03/7637/39 | शरद शिंदे / वैशाली शिंदे | संजीवनी परशुराम प्रसाद / परशुराम प्रसाद |
| १२. | सातिवली | SL08/8097 | सुरेखा अशोक पाटे | संगीता रामकलेश चौरसीया |
| १३. | सातिवली | SL07/1381 | दुर्गा नागेश्वर कांडरेगुल्ला | संजू ताराचंद्र यादव |
| १४. | सातिवली | SL07/1381 | दुर्गा नागेश्वर कांडरेगुल्ला | कुसुमकला दिलीप मौर्या |
| १५. | सातिवली | SL03/9555/72 | वनस्टार डेव्हलपर्स | कैसर आलम मुजीब अन्सारी |
| १६. | सातिवली | SL03/8164/1 | सृष्टी अमृत भातारनकर | विजयकुमार प्रल्हाद गायकवाड |
| १७. | सातिवली | SL03/9643/31 | प्रियंका मिनबतीवाला | अरविंदकुमार पांडे |
| १८. | सातिवली | SL09/8130/12 | तेजबहादुर रामानंद यादव | मनोज रामबली यादव |
| १९. | सातिवली | SL08/6019 | पार्वती प्यारेलाल लामा | रूपेश प्यारेलाल लामा |
| २०. | सातिवली | SL01/400 | देवसन स्विच गिअर ॲण्ड कंट्रोल्स | संजय दोशी / नयना दोशी |

जावक क्र. १६८९/२०२५-२६
दिनांक : १३/११/२०२५

**सही/-**
**सहा.आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# निवडणुकांचा फार्स!

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी लोकांमध्ये साक्षरतेचा अभाव आहे. आपले बरे वाईट कशात आहे हेच लोकांना कळत नाही. देशाबाबत लोकशाहीबाबत आजही कित्येक लोकांना फारशी माहिती नाही. आणि लोकांच्या याच अशिक्षितपणाचा राजकारणी लोकांनी गैरफायदा घेतला.आणि सत्ता कायमची आपल्या मुठीत ठेवली.महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत लाडक्या बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये देऊन अक्षरश त्यांची मते विकत घेतली. तसेच मतदान यंत्रात झोल करून निवडणुकीत बहुमत मिळवले. जे महाराष्ट्रात झाले तेच बिहार विधानसभेच्या निवडणुकीत बघायला मिळाले. त्यामुळे अशा प्रकारे जर सत्ता मिळवायची असेल तर निवडणुका हव्यातच कशाला? मोदी म्हणतात त्याप्रमाणे एक देश एक पक्ष आणि एक नेता निवडणूक आयोगाने ठरवायचा आणि त्याच्याच हातात कायमची सत्ता द्यायची.विरोधी पक्षांची मान्यताच रद्द करून टाकायची. संसदेची दोन्ही सभागृह पाडून टाकायची आणि ती जागा अदानी किंवा अंबानीला द्यायची.म्हणजे त्यावर मोठमोठे टॉवर्स बांधून ते लोक अब्जाधीश होतील. आणि त्यांची संपती वाढली की मोदींच्या आत्म्याला शांती मिळेल. पण आता निवडणुकांचं हे नाटक बंद करा. निवडणुकीचा केवळ फार्स करायचा आणि त्यावर जनतेच्या कोट्यवधी रुपयांचा चुराडा करायचा हे काही बरोबर नाही. निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपवल्यांनी जे महाराष्ट्रात केले, जे बिहार मध्ये केले ते उद्या ममतांच्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत होणार आहे. म्हणून तर मोदी छातीठोकपणे पश्चिम बंगाल जिंकणार असे सांगतवाहेत. बिहारच्या निवडणुकीबद्दल काय सांगायचे. १00 वेळा पक्ष बदलणारे पालटूराम नितीश कुमार अचानक महात्मा होतात आणि त्यांच्या पक्षाला ८0 पेक्षा अधिक चमत्कार मिळतात ही सर्व निवडणूक आयोगातील जादुगारांची किमया आहे. असे आता लोक म्हणत आहेत. निवडणुकी पूर्वी नितीश कुमार सरकारने महिलांच्या खात्यात १0 हजार रुपये टाकले तसेच महिलांच्या हिताच्या काही योजनांचे आमिष दाखवले आणि त्यांची मते विकत घेतली. त्यामुळेच बिहार मध्ये भाजपा प्रणित एनडीए आघाडीला आपले सरकार टिकवण्यात यश आले. त्यातच विरोधकांमधील बेबनाव भाजपा आघाडीच्या पथ्यावर पडला. पण अशाप्रकारे किती दिवस लोकांची मते विकत घेऊन सत्ता टिकवणार? बिहारमध्ये नुकतीच विधानसभा निवडणूक पार पडली. या निवडणुकीचे निकाल आज समोर येत आहेत. या निकालांत भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए बहुमत मिळवताना दिसत आहे. तर दुसरीकडे महागठबंधनाच्या विजयाचे आकडे हळूहळू कमी होताना दिसत आहेत. दरम्यान, देशभरातील भाजपा समर्थक या विजयाचा आनंद साजरा करत असून राजकीय नेत्यांवर मीम्स शेअर करत आहेत. चला तर मग पाहूया बिहार निवडणुकीच्या निमित्तानं व्हायरल होत असलेले मीम्स. बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल कसा लागणार? कोणाला बहुमत मिळणार, एनडीएची पुन्हा एकदा सत्ता येणार की? महाआघाडी बाजी मारणार याबाबत मोठी उत्सुकता होती, अखेर ही उत्सुकता आता संपली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये एनडीएचा दणदणित विजय झाला आहे, तर महाआघाडी विशेष: कॉंग्रेसला मोठा धक्का बसला आहे. सध्या समोर येत असलेल्या निकालानुसार भाजपाने ९0 पेक्षा अधिक जागा मिळवल्या, भाजप बिहारमधील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर नितीशकुमार यांच्या जेडीयूचा नंबर आहे. जेडीयू पक्षाने भाजपा पाठोपाठ मोठे यश मिळवले. तर या निवडणुकीमध्ये एलजेपीला देखील मोठं यश मिळालं आहे, या निवडणुकीत एलजेपी पक्षाने बऱ्यापैकी कामगिरी केली. दरम्यान दुसरीकडे महाआघाडीला मात्र मोठा दणका बसला आहे. महाआघाडीचे उमेदवार केवळ ३0 जागांवर यशस्वी झाले. तर सात ठिकाणी अपक्ष उमेदवार आघाडीवर आहेत. कॉंग्रेसची अवस्था तर खूपच बिकट बनली आहे, कॉंग्रेसचे उमेदवार अवघ्या तीन जागांवर आघाडीवर आहेत. दरम्यान यावर प्रतिक्रिया देताना आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी एक पोस्ट केली आहे, ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे. हरियाणा, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीकडे जनतेचा कौल होता. हे चित्र पोस्टल मतदानात देखील स्पष्ट झाले होते. इ.व्ही.एम. व्होटिंगदरम्यान पहिला एक तास हा कल पोस्टलप्रमाणेच राहिला. परंतु पुढच्या एक दीड तासात सर्व चित्र पालटले. भाजपा आश्चर्यकारक रित्या पुढे गेली आणि धक्कादायक निकाल समोर आला. आज सेम-टू-सेम याच पद्धतीचे चित्र बिहार निवडणुकी दरम्यान निकाल येताना दिसत आहे. येणाऱ्या निकालाने मतदान मोजणीत घोळ होतो यावर शिक्कामोर्तब झालं आहे. सरकारचं बुजगावणं झालेल्या यंत्रणा, निवडणूक आयोग यामुळे एकंदरीतच लोकशाही आणि पर्यायाने आरक्षण व संविधान धोक्यात आलंय हे नक्की! महाराष्ट्रात सत्तास्थापनेचा गुवाहाटी व्हाया सुरत जसा प्रवास झाला तसाच निवडणूक निकाल लावण्याचा आयोगाचा प्रवास हरियाणा टू बिहार व्हाया महाराष्ट्र असा दिसून येतो. असो, हि निवडणूक थेट बिहारची जनता विरुद्ध इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया यांच्यात आहे. आता भाजपा आघाडीच्या विजयाचे नेमके रहस्य कशात दडले आहे याची आता कारण मीमांसा सुरू होईल. पण या निवडणुकीत लाडक्या बहिणींना जे १0 हजार वाटण्यात आले त्याचा मोठा परिणाम आहे.असे आता केवळ विरोधकच नव्हे तर भाजपाचे मित्रपक्ष सुधा म्हणत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत पैसा जिंकला आणि लोकशाही हरली असेच म्हणावे लागेल. या निवडणुकीच्या निकालातून विरोधी पक्षाने आणि खास करून कॉंग्रेसने धडा घ्यावा. मागील उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा दारूण पराभव झाला होता. अगदी तसाच दारूण पराभव बिहारमध्ये झाला.

# मौलाना अबुल कलाम आझाद शिक्षण दिनाचे दूत!



११ नोव्हेंबर संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्या दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षणमंत्री थोर देशभक्त स्वातंत्र्य सेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दिन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती, पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई आरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती.

अगदी लहान वयातच त्यांनी आरबी 'फारशी'आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले त्यांना तर तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आणि गणित विषयाची आवड होती. तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाडा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याया अत्याचारा विरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी आल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजा विरुद्ध रान पेटवत असत त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी आल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटी विरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाडा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्त्वे शेवटपर्यंत जपली. असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधीचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते कॉंग्रेसचे प्रमुख नेते बनले इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या पस्तीसाव्या वर्षी ते कॉंग्रेसचे अध्यक्षही बनले कॉंग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे वृत्त स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षण मंत्री म्हणून स्थान मिळाले ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांना त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणा चा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही त्यांच्या या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

मौलाना अबुल कलाम आझाद यांचे कर्तुत्व प्रभावी होते. तसेच ते उत्तम लेखक होते कुराणाचा अनुवाद केलेला जू मानुल कोरोनहा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडियन विन्स हे त्यांचे स्वचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले मौलाना आझाद यांना परराष्ट्र नितीचा खूप अभ्यास होता, विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ ऑर्डरचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्या विषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते .देश स्वतंत्र व्हावा तसे देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा केली .१९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला .मौलाना आझाद यांचे २३फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. अशा महान देशभक्त व शिक्षण तज्ञ नेत्याच्या पावन स्मृतीस क्राईम संध्या परिवारातर्फे विनम्र अभिवादन.

**– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर**

# केशवसृष्टी ऑक्सिजन पार्कमध्ये तीन दिवसीय बांबू महोत्सव





**पालघर : वार्ताहर**

बांबूचे पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक महत्त्व जनतेसमोर अधोरेखित करणे, तसेच बांबू आधारित उद्योग, हस्तकला आणि स्थानिक रोजगार निर्मितीला चालना देणे या उद्देशाने जव्हार येथे नुकताच तीन दिवसीय बांबू महोत्सव संपन्न झाला होता. महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आदिवासी कुटुंबाला अर्थव्यवस्थेला बळ मिळणार आहे. पालघर जिल्ह्यातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायाच्या अर्थव्यवस्थेला बांबू या नैसर्गिक संसाधनाच्या माध्यमातून बळकटी देण्यासाठी केशवसृष्टी संस्थेच्या वतीने जव्हार येथील केशवसृष्टी ऑक्सिजन पार्क येथे ८, ९ व १० नोव्हेंबर तीन दिवसीय बांबू महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

जलद वाढणारे, पर्यावरणपूरक आणि दीर्घकाळ टिकणारे बांबू हे ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी कसे वरदान ठरू शकते, हा संदेश या उत्सवाद्वारे यशस्वीरित्या पोहोचवण्यात आला. तीन दिवसीय बांबू महोत्सवात ग्रामीण व शहरी भागातून २००० हून अधिक नागरिक, शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी आणि स्थानिक कलाकारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या महोत्सवात आदिवासी कला प्रदर्शनच्या माध्यमातून तारपा, ढोल, टिपरी आणि तूर यांसारख्या लुप्त होत चाललेल्या पारंपरिक कला पंधरा कला-गटांनी सादर केल्या. यासह वारली पेंटिंग, रांगोळी, रानभाज्यांच्या पाककला आणि भजन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. बांबू लागवडीतून उपलब्ध होणाऱ्या बांबूद्वारे ग्रामीण भागातील नागरिक रोजगारासाठी बांबूच्या विविध हस्तकला, आधुनिक बांबू वस्तू, घरगुती आणि सजावटीच्या वस्तू बनवू शकतात याकरिता प्रदर्शन व प्रात्यक्षिक भरवण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून सहभागी आदिवासी महिलांना जवळपास ३0,000 चे उत्पन्न प्राप्त झाले. ग्रामीण भागात तरुण वर्गामध्ये युट्युब आणि रील क्रिएटर्ससाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धा व उपक्रमांमध्ये एकूण ३३७ स्पर्धक सहभागी झाले, ज्यामुळे तरुण आणि महिलांमध्ये स्वरोजगार आणि उद्योजकतेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. या महोत्सवाला विक्रमगड विधानसभेचे आमदार हरिश्चंद्र भोये, प्रकल्प अधिकारी अपूर्वा बसूर, तसेच उपजिल्हाधिकारी विजया जाधव यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी केशवसृष्टीचे सहकार्यवाह संतोष गायकवाड, आशा खोडे, गौरव श्रीवास्तव, मोहित गाडीया, केंद्र पालक प्रमिला कोकड, श्री. पिलाना, केंद्रप्रमुख कैलास कुरकुटे, विस्तारक राहुल खोटरा आणि कृषी प्रमुख उमेश राऊळ यांच्यासह संस्थेचे सर्व कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यांनी काम केले. केशवसृष्टी संस्थेतर्फे वाडा, विक्रमगड, जव्हार, कासा व खोडाळा या भागातील १७0 गावांमध्ये गेल्या काही वर्षांपासून ग्रामविकासाचे भरीव कार्य सुरू आहे. कृषीजल, शिक्षण, आरोग्य आणि गृह उद्योग-स्वयंरोजगार या माध्यमातून डोंगरी, ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना बांबू उद्योगाच्या माध्यमातून स्थायी रोजगार उपलब्ध करून देणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. केशवसृष्टीचे बिमलजी केडिया यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यात मोठे योगदान देण्याचा विश्वास व्यक्त केला. बांबू महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून देखील पालघर जिल्ह्यात गेल्या वर्षभरात साडेदहा लक्ष बांबू लागवड करण्यात आली आहे. मनरेगा अंतर्गत बांबू लागवडीत पालघर जिल्हा राज्यात प्रथम असून, पुढील तीन वर्षांत या बांबू लागवडीचा चांगला परिणाम रोजगार आणि आर्थिक उत्पन्नावर दिसून येईल, असे रोहयोचे उपजिल्हाधिकारी विजया जाधव यांनी सांगितले.

# पाकिस्तानात बंदी केलेल्या खलाशांना सोडवण्याकरिता मच्छीमार नेते प्रयत्नशील

**पालघर : वार्ताहर**

राज्यातील १९ खलाशांसह देशातील २०० पेक्षा अधिक मच्छिमार खलाशी पाकिस्तानच्या तुरुंगात कारावास भोगत असून त्यांच्या सुटकेसठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष रामकृष्ण तांडेल व इतर पदाधिकाऱ्यांनी गुजरातच्या मत्स्य व्यवसाय विभागांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी ओखा येथे नलनारायण मासेमारी बोटीवर खलाशी म्हणून काम करणारे सातपाटी येथील नामदेव बाळकृष्ण मेहेर यांच्यासह अन्य आठ खलाशांना मासेमारी बोटीसह पाकिस्तान ने ताब्यात घेतल्याबाबत माहिती मिळाली. त्यांच्या कुटुंबीयांना स्थानिक मच्छीमार तसेच मच्छीमार संघटनांच्या पदाधिकारी यांनी भेट घेऊन धीर दिला.



अटकेत मच्छीमार खलाशांच्या सुटकेसाठी प्रयत्न करणार असल्याचे कुटुंबीयांना आश्वासन दिले. राष्ट्रीय मच्छीमार संघटना अर्थात नॅशनल फिश वर्कर फोरमचे अध्यक्ष रामकृष्ण तांडेल यांनी ओखा, पोरबंदर येथील बोट असोसिएशन चे अध्यक्ष मनोज मोरी, जीवन जुंगी तसेच जेष्ठ पत्रकार जतीन देसाई यांच्यामार्फत बोटीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासह दिल्ली फोरम चे संचालक तसेच पाकिस्तान इंडिया पिपल्स फोरम फॉर पिस ऑफ डेमोक्रसी चे सदस्य जतिन देसाई पाकिस्तानी पकडलेल्या बोटीबाबत तपशील मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला होता. मात्र काही दिवस ही बोट समुद्रातच ठेवल्याने भारतीय व पाकिस्तान मच्छिमार नेत्यांना त्याची माहिती मिळाली नाही. १० नोव्हेंबर रोजी गुजरात, गांधीनगरला कोस्ट गार्ड च्या वार्षिक सभे मध्ये वरील बोटीची माहिती देऊन तटरक्षक दलाने (कोस्ट गार्ड) या प्रकरणात लक्ष देण्याबाबत आवाहन करण्यात आले. रामकृष्ण तांडेल यांनी बाब मच्छीमार नेत्यांनी गुजरात राज्याचे मत्स्यव्यवसाय खात्याचे उपसंचालक रमेशकुमार शेखरालिया यांची गुजरात मधील मच्छिमार नेते अशोक श्रीमाली व चंद्रकांत पटेल यांच्या समवेत भेट घेऊन पाकिस्तानी ताब्यात घेतलेल्या बोटीबद्दल माहिती दिली. पाकिस्तानी नव्याने अटक केलेल्या खलाशांना तसेच यापूर्वी अटकेत असणाऱ्या खलाशांची लवकरात लवकर सोडवण्या साठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांना विनंती करण्यात आली. नव्याने अटक असलेल्या गुजरात मधील सात खलाशां बाबत केंद्र शासनाकडून कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रत्येकाच्या घरी जाऊन चौकशी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. पाकिस्तान मध्ये अटकेत असलेले १९७ खलाशांना लवकरात लवकर सोडविण्यासाठी परराष्ट्र मंत्री यांची भेट घेऊ असे नॅशनल फिशवर्कर्स फोरम चे अध्यक्ष व पाकिस्तान इंडिया पिपल्स फोरम फॉर पिस अँड डेमोक्रसीचे सदस्य रामकृष्ण तांडेल यांनी सांगितले.

# खासदार डॉ. हेमंत सावरा यांच्या हस्ते नवीन लिफ्टचे लोकार्पण

**पालघर : वार्ताहर**



सफाळे रेल्वे स्टेशनवरील नव्याने उभारलेल्या एफओबीवरील दुहेरी दरवाज्याच्या लिफ्टचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. हा महत्त्वपूर्ण प्रकल्प डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, इंडियन रेल्वे आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्ण करण्यात आला आहे. या लिफ्टचे लोकार्पण खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्या हस्ते संपन्न झाले. या वेळी सफाळे, माकणे, कर्दळ ग्रामपंचायत प्रतिनिधी, सफाळे स्टेशन कमिटीचे सदस्य, सफाळे विकास कृती समिती, रेल्वे परिसर व्यापारी संघटना तसेच अनेक प्रवासी उपस्थित होते. नवीन लिफ्ट सुरू झाल्याने सफाळे स्टेशनवरील प्रवाशांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग प्रवाशांना-मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमादरम्यान खासदार डॉ. सवरा यांचा वाढदिवसही उत्साहात साजरा करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थितांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नवीन लिफ्ट सुरू झाल्याने सफाळे स्टेशनवरील सेवा व सुविधा वाढण्यास आणखी एक महत्त्वाची पायरी गाठली गेली आहे. सफाळे रेल्वे प्लॅटफॉर्म क्र. १ वर १५ डिसेंबरपर्यंत सरकता जिना (एस्केलेटर) सुरू करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला देण्यात आले आहेत. भुयारी मार्गासाठी रेल्वेचे डीआरएम यांच्याशी स्वतंत्र बैठक घेऊन पुढील नियोजन केले जाईल. सफाळे रेल्वे स्थानकाचा विकास करताना पुढील २५ वर्षांचा विचार करूनच पावले उचलली जात आहेत, असे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी सांगितले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भिवंडीत महानगरपालिकेची मोबाईल मेडिकल युनिट सेवा सुरू, नागरिकांना मोफत आरोग्यसेवा मिळणार!



**भिवंडी : वार्ताहर**

नागरिकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी भिवंडी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने आज लँडमार्क केअरर्स आणि महापालिकेच्या संयुक्त उपक्रमाने मोबाइल मेडिकल युनिट (एमएमयू) सेवा सुरू केली. या सेवेचे उदघाटन आयुक्त अनमोल सागर यांनी केले. याप्रसंगी आयुक्त अनमोल सागर यांनी सांगितले की, भिवंडीतील नागरिकांना त्यांच्या दाराशी प्राथमिक आरोग्यसेवा प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे. मोबाईल मेडिकल युनिटचा शुभारंभ हा या दिशेने एक मोठा टप्पा आहे. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने नागरिकांना लँडमार्क केअरर्स मोबाईल मेडिकल युनिट सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आणि त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे. दरम्यान उद्घाटन समारंभात वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी सांगितले की, हे मोबाईल युनिट भिवंडी महापालिका क्षेत्रातील २२ ठिकाणी प्राथमिक आरोग्यसेवा प्रदान करेल. प्रत्येक मोबाईल युनिटमध्ये एक एमबीबीएस डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट, आरोग्य शिक्षक आणि चालक असतील. हे मोबाईल युनिट नागरिकांना ताप, सर्दी, श्वसनाचे आजार, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या सामान्य आजारांसाठी तपासणी, उपचार आणि आरोग्य सल्ला देईल. गरज पडल्यास गंभीर रुग्णांना उच्च दर्जाच्या रुग्णालयात देखील पाठवले जाईल. या योजनेचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये आरोग्य जागरूकता वाढवणे आणि आजारांचे लवकर निदान आणि उपचार सुनिश्चित करणे आहे, असे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर, लँडमार्क ग्रुपचे प्रतिनिधी वैभव सावंत आणि संदीप क्रुणे यांच्यासह पिरामल हेल्थ फाउंडेशनचे प्रमोद खरात, नीरजा बनकर, गणेश घुले आणि शैलेश अनाभावे उपस्थित होते.

# भिवंडी महापालिकेत महिला राज

**भिवंडी : वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालासह तारखा जाहीर झाल्याने भिवंडी महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी आयुक्त अनमोल सागर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सकाळी अंजूर फाटा परिसरातील भिवंडी रेल्वे स्टेशन जवळील मानसी भारत गडा महाविद्यालयाच्या सभागृहात आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये एकूण २३ प्रभाग क्षेत्रातील नगरसेवक पदाच्या ९० जागांसाठी शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठीद्वारे आरक्षण सोडत निश्चित करण्यात आली आहे. या आरक्षण सोडतीत ९० पैकी ४५ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्याने टक्केवारीनुसार ५० टक्के जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्याने येत्या भिवंडी महापालिका निवडणुकीत 'महिला राज' दिसून येणार असल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान यामध्ये अनुसूचित जातीसाठी ३ जागा असून त्यापैकी २ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. तसेच अनुसूचित जमाती करिता १ सर्वसाधारण जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. तर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी २४ जागा आरक्षित ठेवल्या असून त्यापैकी १२ जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. यासह सर्वसाधारण मध्ये ६२ जागा ठेवण्यात आल्या असून ३१ जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यावेळी शहरातील लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण सोडत कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण यू ट्यूबवर ठेवण्यात आले होते. तर ११०० नागरिकांनी यू ट्यूब हे आरक्षण सोडत प्रक्षेपण पाहिले. तसेच या आरक्षण सोडतीचा निकाल राज्य निवडणूक आयोगाला मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. १७ ते २४ नोव्हेंबर रोजीपर्यंत हरकती सादर करण्याचे आवाहन आयुक्त यांनी केले आहे.

# आर्थिक व शारीरिक परिस्थितीवर मात करत सावद गावची प्रियंका जाधव बनली 'सीए'



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडीतील सावद गावातील प्रियांका जाधव हिने सीए परीक्षा उत्तीर्ण केली आहे. घरची आर्थिक परिस्थिती बेताची, त्यातच दिव्यांग असलेल्या प्रियंकाने अथक परिश्रम व जिद्दीने सीएची परीक्षा पास केली आहे. सीए परीक्षा उत्तीर्ण होऊन तीने आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करत संपूर्ण कुटुंबाचे व तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. दिव्यांग असलेली प्रियंका लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होती. दहावी आणि पदवी परीक्षेत उत्तम गुण मिळवत तिने बालपणापासून उराशी बाळगलेले सी.ए. बनण्याचे' स्वप्न अखेर सत्यात उतरवले आहे. तिचे वडील सुरेश जाधव हे गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करतात तर आई जिजाबाई या शेतात भाजीपाला पिकवून व विक्री करून कुटुंबाचा सांभाळ करत आहेत. अशा कठीण परिस्थितीतही मुलीने सी.ए. परीक्षा उत्तीर्ण केल्याने संपूर्ण कुटुंबासह गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. माझ्या आईने शेतात दिवसभर काम करून, भाजीपाला विकून मला शिकवले.वडिलांनी गोडाऊनमध्ये साफसफाईचे काम करत शिक्षणासाठी पाठिंबा दिला, त्यांच्या त्यागामुळेच मला सी.ए. परीक्षेत यश मिळाले असून माझा विश्वास आहे की कोणत्याही दिव्यांग व्यक्तीने स्वतःला कमी समजू नये, आपल्यातही मोठं होण्याची क्षमता, जिद्द आणि सामर्थ्य आहे अशी प्रतिक्रिया प्रियंका जाधव हिने दिली आहे.

# दिवंगत रंगकर्मी गौरव समारंभ उत्साहात संपन्न



**वसई : वार्ताहर**

बाप्पा रंगमंच आणि भंडारी विश्वस्त मंडळ, वसई यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत रंगकर्मी गौरव समारंभाचा भव्य कार्यक्रम अनंतराव ठाकूर नाट्यगृहात उत्साहात संपन्न झाला. या समारंभात भंडारी समाजातील दिवंगत रंगकर्मी स्व. चिंतामण राऊत, निळू राऊत, अनंत म्हात्रे, मोरेश्वर चौधरी, मनोहर पाटील, कृष्णा पाटील यांसारख्या अनेक कलावंतांच्या वारसांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. रंगभूमीला आपले आयुष्य अर्पण केलेल्या या कलाकारांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. समारंभानंतर समाजातील तरुण कलावंतांनी पु.ल. देशपांडे लिखित 'तुझे आहे तुझपाशी' हे सदाबहार नाटक सादर करून प्रेक्षकांची मनं जिंकली. नाटकाचे दिग्दर्शन हृदयनाथ कडू यांनी केले. नाटकातील प्रमुख भूमिकेत विजय म्हात्रे, हृदयनाथ कडू, सचिन राऊत, पल्लवी पाटील, वेदीका राऊत, भाग्येश चौधरी, प्रिया म्हात्रे आणि रंजना ठाकूर यांनी प्रभावी भूमिका साकारल्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन मिलिंद म्हात्रे व आकांक्षा राऊत यांनी करून कार्यक्रमाला रंगत आणली. रंगकर्मी गौरव समारंभ व नाट्यप्रयोग या दुहेरी सोहळ्याने वसईतील नाट्यप्रेमींचा उत्साह द्विगुणित झाला.

# सुक्या मच्छी उत्पादकांना आर्थिक फटका

**वसई : वार्ताहर**

अवकाळी पावसाने भातशेतीला फटका बसला त्याप्रमाणेच वसई सुक्या मच्छी उत्पादकांनाही मोठ्या प्रमाणात पुन्हा आर्थिक फटका बसलेला आहे. वसईतील पाचुबंदर व अर्नाळा येथील मच्छीमार यामुळे उध्वस्त होऊन या व्यवसायातून कायमचा हद्दपार होईल अशी चिन्ह आहेत. वसईतील पाचुबंदर व अर्नाळा भागातील सुमारे २५०० ते ३ हजार मच्छीमार कुटुंबाचे नुकसान झाले आहे. यावर्षी सुक्या मच्छी उत्पादकांना निसर्गाच्या लहरीपणामुळे नुकसानच नुकसान सहन करावे लागले आहे. ६ व ७ मे रोजी वसई तालुक्यात मुसळधार पाऊस झाला होता. यात बागायती शेतकरी व मच्छीमारांचेही नुकसान झाले होते. त्याचे ८३ पंचनामे करण्यात आले होते. या नुकसानातून पुन्हा नव्याने सुरुवात केलेल्या मच्छीमारांना मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने पुन्हा फटका बसला आहे. यावर्षी समुद्रात निर्माण झालेले कमी दाबाचे पट्टे व अवकाळी पाऊस हे चक्र वारंवार सुरू आहे परिणामी मागील आठवड्यात मुसळधार पावसाने शेतकरी व मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. सुक्या मच्छी उत्पादकांनी नुकसान झालेली मासळी पुन्हा समुद्रात फेकून नष्ट केली आहे. अवकाळी पावसाने या व्यवसायावर टाच आणली आहे. पावसाचे पाणी व बदलते हवामान यामुळे अशा सुक्या मासळीमध्ये किडे पडून मच्छीमारांचे श्रम, पैसे वाया गेले आहेत. वादळामुळे समुद्रात मच्छिमार मोठींना निर्बंध घालण्यात आले होते.

# ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी दिली काँग्रेसला सोडचिठ्ठी; प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्यावर गंभीर आरोप

**भिवंडी : वार्ताहर**



बिहार निवडणुकीत काँग्रेस पक्षाला दारूण पराभवाचा सामना करावा लागत असताना महाराष्ट्रात ही काँग्रेस पक्षाला गळती लागण्यास सुरवात झाली आहे.ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करीत जिल्हाध्यक्ष पदासह पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या भूमिकेनंतर त्यांचे समर्थक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यामध्ये खळबळ उडाली आहे. संपूर्ण कोकणात काँग्रेस नेस्तनाबूत झाली आहे, असे असताना प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ हे कोकणातील काँग्रेस कडे दुर्लक्ष करीत पश्चिम महाराष्ट्रा, विदर्भ या भागात लक्ष देत असल्याचे सांगत दयानंद चोरघे यांनी आपली काँग्रेस पक्षावर नाराजी नसून प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी असल्याचे स्पष्ट केले. देशाचे नेते राहील गांधी यांनी स्वतः जिल्हाध्यक्षांना अधिक ताकद देण्याचे सांगितले असताना त्याकडे लक्ष न देत हर्षवर्धन सकपाळ थेट आपल्या मर्जीतील प्रभारींमार्फत ब्लॉक अध्यक्षांची नियुक्ती करीत आहेत. त्यामध्ये आर्थिक पैशांचा व्यवहार करून पैसे घेऊन ब्लॉक अध्यक्ष नेमले जात असल्याचा आरोप दयानंद चोरघे यांनी केला आहे.त्यासाठी स्थानिक राजकारणाची माहिती नसलेल्या व्यक्ती प्रभारी म्हणून नेमल्या गेल्या आहेत. जे फक्त हर्षवर्धन सकपाळ यांच्यासाठी काम करीत असल्याचा आरोप केला आहे.त्यांनी नेमलेले ब्लॉक अध्यक्ष हे आमचे गॉडफादर दिल्लीत बसल्याचे सांगतात मग आम्ही स्थानिक पातळी वर काम कसं करायचे असा सवाल दयानंद चोरघे यांनी उपस्थित केला आहे.

अंबरनाथ बदलापूर नगरपालिका निवडणुकीत जिल्हाधक्ष म्हणून मला विश्वासात न घेता परस्पर उमेदवारी दिल्या गेल्या आहेत. माझे मार्गदर्शक बाळासाहेब थोरात आहेत आणि राहतील.पण काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या नाकर्ते पणामुळे काम करणे शक्य नसल्याने मी काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाचा व काँग्रेस प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे दयानंद चोरघे यांनी शेवटी स्पष्ट केले.

# जैन स्पोर्टस् अकॅडमीच्या ८ खेळाडूंची ८व्या महाराष्ट्र राज्य कॅडेट स्पर्धेसाठी निवड



**जळगाव : वार्ताहर**

जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशन व जैन स्पोर्टस् अक्ॅडमी यांच्या वतीने अनुभूती निवासी स्कूल येथे आज कॅडेट (१२ ते १४ वयोगटातील) मुलं आणि मुली निवड चाचणी घेण्यात आली होती. या स्पर्धेत रावेर, बोदवड, जळगाव येथील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये जैन स्पोर्टस् अकॅडमीचे ८ खेळाडूंची १३ ते १५ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथे होणार असलेल्या ८ व्या महाराष्ट्र राज्य कॅडेट तायक्कांडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. साधना देशमुख, समिक्षा पवार, भाविका पाटील, दिया देशपांडे, शिनय जैन, गुरु कारंडे, मयुर पाटील, अबिर चौबे या जैन स्पोर्टस अॅकडमीच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

निवड चाचणीसाठी झालेल्या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू : मुली :- साधना देशमुख, नम्रता बारी, खुषी बारी, समिक्षा पवार, त्रिशा झिरमाळी, भाविका पाटील, हर्षदा गायकवाड, आकांक्षा कळमकर, दिया देशपांडे, शिनाय जैन. मुलं : गुरु कारंडे, जयेश गुरचल, पार्थ माळी, सर्वेश पिसे, मयुर पाटील, अर्थव सोनार, पुष्कर पिसे, अबिर चौबे, दुर्गेश गवारे इत्यादी प्रशिक्षक म्हणून जयेश कासार, निकेतन खोडके तर मॅनेजर म्हणून स्नेहल अट्रावलकर यांची निवड करण्यात आली आहे. सदर यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक जयेश बाविस्कर, जयेश कासार, निकेतन खोडके, गिरीश खोडके यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी पंच म्हणून श्रेयांग खेकारे, स्मिता बाविस्कर, जयेश बाविस्कर, आशुतोष सोळंकी, राहुल चव्हाण, दानीश तडवी यांनी सहकार्य केले. यशस्वी खेळाडूंचे जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशनचे अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष ललित पाटील, खजिनदार सुरेश खैरनार, सचिव अजित घारगे, सहसचिव रविंद्र धर्माधिकारी, सदस्य नरेंद्र महाजन, कृष्णकुमार तायडे, महेश घारगे, सौरभ चौबे तसेच जैन स्पोर्टस् अकॅडमीचे अरविंद देशपांडे यांनी कौतुक करून या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# नवजात बाळ आढळल्याने खळबळ!

**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा पश्चिमेकडील प्रसिद्ध कळंब समुद्रकिनाऱ्यावर बुधवारी सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास स्थानिक ग्रामस्थांना वाळूत गुंडाळलेली एक नवजात बाळ आढळल्याने खळबळ उडाली. बाळ फक्त दोन दिवसांचं असल्याचे सांगण्यात येत आहे. गावकऱ्यांनी तातडीने अर्नाळा पोलिसांना माहिती दिली, त्यानंतर त्यांनी घटनास्थळी पोहोचून बाळाला विरारच्या बोळिंज येथील वसई-विरार महापालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, बाळ सध्या निरोगी आहे आणि निरीक्षणाखाली आहे. सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या काही स्थानिकांना रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी जवळ जाऊन पाहिल्यावर एक बाळ कपड्यात गुंडाळलेले दिसले, परंतु त्याच्या जवळपास कोणीही नसल्याचे पाहून त्यांनी ताबडतोब पोलिसांना कळवले. अर्नाळा पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे आणि तपास सुरू केला आहे. बाळाला समुद्रकिनाऱ्यावर कोणी आणि का सोडले याचा शोध पोलिस घेत आहेत. गुन्हेगाराची ओळख पटविण्यासाठी जवळच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. कळंब समुद्रकिनाऱ्यावर नवजात बाळ सापडण्याची ही दुसरी घटना असल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वीही याच परिसरात एका बाळाला सोडून देण्यात आले होते. अशा वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये संताप आणि चिंता दोन्ही निर्माण झाली आहे. स्थानिक सामाजिक संघटनांनी अशा घटना रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे आणि बाळाची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शविली आहे. अशा घटनांना आळा घालण्यासाठी त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत जिल्हास्तरीय समिती गठीत

लातूर : खराब रस्ते व रस्त्यांवरील खड्डे यामुळे होणारे अपघात व मृत्यू याबाबत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी झाली असून सदर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने आदेश पारीत केलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हद्दीबाहेरील ग्रामीण भागातील क्षेत्रात रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी, तसेच खड्ड्यांमुळे व मानवनिर्मित उघडे गटार यामुळे मृत्यूमुखी अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याच्यादृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हद्दीबाहेरील ग्रामीण भागातील क्षेत्रातील रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मृत्यूमुखी पडलेल्या अथवा अपघातग्रस्त नागरिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्याच्यादृष्टीने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांचाही समावेश आहे. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत हद्दीबाहेरील ग्रामीण क्षेत्रातील खड्ड्यांबाबत लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच laturcollectorgmail.com या ई-मेल आयडीवर तक्रार दाखल करता येईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### महाराष्ट्रातील खासगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा'लक्ष्य-मान्यता' उपक्रम

मुंबई : राज्यातील खासगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसुतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता (LaQshya-Certification) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. हा उपक्रम राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (Respectful Maternity Care) सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खासगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे. लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खासगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे आहे. हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) आणि Jhpiego या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. गहळिशसे संस्थेमार्फत फॉग्सी आणि खासगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे.

### नंदिनी पडिले यांना सावित्रीबाई फुले नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार जाहीर

लातूर : लातूरच्या योग व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य करत असलेल्या नंदिनी पडिले यांना अत्यंत प्रतिष्ठित मानला जाणारा सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. १६ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार नंदिनी पडिले यांना प्रदान करण्यात येणार आहे. नंदिनी पडिले या गेल्या आठ-दहा वर्षांपासून लातूरमध्ये सनराईज् योगा स्टुडिओच्या माध्यमातून स्त्रियांच्या आरोग्याच्या प्रश्नावर, समुपदेशनच्या माध्यमातून कार्य करत आहेत. यासाठी त्यांनी सनराईज योगा स्टुडिओची निर्मिती केलेली आहे. तसेच सनराईज बहुउद्देशीय सामाजिक संस्थेद्वारे गोरगरीब शालेय महाविद्यालयीन मुलींच्या आरोग्यासाठी शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य करत असतात. नुकत्याच आशियाई बेसबॉल चॅम्पियनशिपसाठी लातूर येथील एका गरीब विद्यार्थिनीची निवड झाली होती. स्वतःचा वाढदिवस साजरा न करता त्यांनी त्या विद्यार्थिनीला आर्थिक मदत केलेली आहे. आत्तापर्यंत शहरातील तीन हजार महिलांना त्यांनी योगा केंद्र केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले आहे. तसेच देवराईच्या पर्यावरण कार्यासाठी त्या अनेक वर्षापासून कार्य करत आहेत. मराठवाड्यातील २०० दुर्मिळ वनस्पतींची माहिती त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संकलित करून सिने अभिनेते सयाजी शिंदे यांना सुपूर्द केली आहे. या कार्याबद्दल कवी लेखक अरविंद जगताप यांनी त्यांचा सन्मान केलेला आहे. त्यांना सावित्रीबाई फुले महाराष्ट्र नारीशक्ती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. सामाजिक कार्यात अनेक संस्थांसोबत त्या कार्यरत असल्यामुळे सह्याद्री देवराई ,सनराईज योगा स्टुडिओ, हरीती वाचक चळवळ, दक्ष नागरिक, नारी प्रबोधन मंच, लातूर वृक्ष चळवळ, योग आणि फिटनेस सेंटरसह अनेक संस्थांनी देखील त्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

### मनपा निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी जोरात

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने जोरदार तयारी सुरू केली आहे. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने इच्छूक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया जाहीर केली आहे. इच्छूक उमेदवारांचे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे दि १५ नोव्हेंबर पासून २३ नोव्हेंबर पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. ही प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने एका विशेष समितीची स्थापना केली आहे. या समिती कडे अर्ज स्वीकारण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असून या समितीत बालाप्रसाद बिदादा, दगडूआप्पा मिटकरी, नामदेव इगे, रफीक सय्यद,प्रा. सिद्राम कटारे, प्रा.प्रवीण कांबळे, संजय निलेगावकर,मनोज देशमुख या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे हे सर्व पदाधिकारी काँग्रेस भवन येथे सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत उपस्थित राहून सर्व इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारतील आणि पक्षाच्या निवडणूक तयारीतील महत्त्वपूर्ण टप्प्याची पूर्तता करतील. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तयारी काँग्रेस पक्षाचे राज्याचे माजी मंत्री, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकदीने काँग्रेस निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे.

# ऐनशेत ते गांधरे मार्गाची दुर्लक्षामुळे दयनीय अवस्था



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील रस्त्यांचे नूतनीकरण होते मात्र त्यानंतर या रस्त्यांच्या देखभालीकडे कंत्राटदार ढुंकूनही बघत नसल्याने अनेक चांगले रस्ते संकटात सापडले आहेत. ऐनशेत ते गांधरे या रस्त्याकडे वाडा शहरातील लोकांना महामार्गाशी जोडायला पर्यायी मार्ग म्हणून बघितले जाते. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करून ३ वर्षे उलटले मात्र एकदाही रस्त्याची दुरुस्ती न केल्याने सध्या हा मार्ग संकटात सापडला आहे. नवीन रस्ता बनविला की पुढील ५ किंवा १० वर्षे कंत्राटदार या मार्गाची देखभाल दुरुस्ती करतो तसेच त्यानंतर संबंधित विभाग रस्त्याची काळजी घेतो. वाडा तालुक्यात दरवर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना तसेच आमदार व खासदार निधीतून लहानमोठे रस्ते बांधले जातात. रस्त्यांच्या उभारणी नंतर देयके खिशात आली की कंत्राटदार रस्त्याकडे सपशेल दुर्लक्ष करतात असा लोकांचा आरोप आहे. अधिकारी वर्ग कागदीघोडे नाचवून पुढील ५ किंवा १० वर्षे देखभाल दुरुस्तीसाठी जमा केलेली रक्कम कंत्राटदारांना देऊन मोकळे होतात असा अनुभव आहे.

# विरार पुलावर मॅजिक वाहनाला आग, वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे वाचले विद्यार्थ्यांचे प्राण

**विरार : वार्ताहर**

विरार पूर्व पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलावर आज सकाळी शाळकरी मुलांना घेऊन जाणाऱ्या टाटा मॅजिक वाहनाला आग लागल्याची घडली. वाहनात झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली. यामुळे रस्त्यावरून प्रवास करणारे वाहनचालक आणि पादचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली. पण, या गोंधळात घटनास्थळी उपस्थित असणाऱ्या वाहतूक पोलिसांनी जळत्या वाहनातून शाळकरी विद्यार्थ्यांना बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. वसई विरारमध्ये बहुतांश शाळकरी विद्यार्थी शाळेच्या बसेस,रिक्षा तसेच टाटा मॅजिक यांसारख्या वाहनातून प्रवास करतात. आज सकाळी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी असेच एक टाटा मॅजिक वाहन विरार येथील चंदनसार रस्त्याकडून पूर्व पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलावरून चालले होते.पण, वाहन सुरू असताना अचानक चालत्या वाहनाला आग लागली. यामुळे पुलावरून चालणारे पादचारी आणि वाहनचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली. यावेळी घटनास्थळी कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलीस हवालदार कैलास



कोकाटे आणि पोलीस शिपाई सुभाष जाधव यांनी वेळेत धाव घेत तत्परतेने विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढले, त्यामुळे मोठा अपघात टळला. यावेळी पोलिसांनी ७ ते ८ मुलांना या वाहनातून बाहेर काढले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. तर वाहनाची तपासणी केली असता शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे समोर आले आहे. वाहतूक पोलिसांनी दाखवलेल्या धाडसाचे आणि सतर्कतेचे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कौतुक केले जात आहे. विरारमध्ये घडलेल्या या घटनेत पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना आज टळली आहे. पण, असे असले तरी खबरदारी म्हणून खाजगी वाहनांमधून शालेय विद्यार्थ्यांनी प्रवास करू नये असे आवाहन पोलिसांनी केले आहे. वसई-विरार शहरातील बहुसंख्य विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचण्यासाठी टाटा मॅजिकसारख्या खाजगी वाहनांचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. मात्र, यापैकी अनेक वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र नसणे, वाहनाची नियमित दुरुस्ती न करणे आणि क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक करणे या गंभीर त्रुटी वारंवार निदर्शनास येतात. अशा असुरक्षित वाहतुकीमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसई विरार शहरात बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्या टाटा मॅजिक वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यामुळे स्थानिक रिक्षाचालकांचे नुकसान होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. त्यामुळे सोमवारी महापालिका सभागृहात पार पडलेल्या बैठकीत अशा बेकायदेशीर टाटा मॅजिक वाहनांवर कारवाई करण्याचे सूचना देण्यात आल्या आहेत.

# पीक गावातील महिलांचा पाण्यासाठी आटापिटा!



**वाडा : वार्ताहर**

तालुक्यातील पीक गावात दोन पाणी पुरवठा योजना असूनही आदिवासी लोकवस्तीत लोकांना पाण्यासाठी आटापिटा करावा लागतो. जलजीवन मिशन योजनेतून घरोघरी जोडण्या करण्यात आल्या आहेत मात्र त्यांना पाणी येणार कधी असा लोकांचा सवाल आहे. गावात अनेक ठिकाणी वाहिन्यांना गळती लागल्याने पाणी लोकांना प्यायला कमी व रस्त्यावर जास्त वाहून जात असल्याचे पाहायला मिळत आहे. पाणी पुरवठा विभागाने आता मरगळ झटकून कामाला लागावे अशी मागणी केली जात आहे. जिल्हा परिषद शाळेच्या जवळ एका स्टँडपोस्टवर पाणी भरायला महिलांची गर्दी होत असून हंडाभर पाणी भरताना जीव मेटाकुटीला येतो असे महिला सांगतात. नवीन योजना सुरू होणार तरी कधी असा सवाल विचारला जात असून पर्यायी व्यवस्था तरी करावी अशी मागणी केली जात आहे. पाण्याच्या टाकीजवळ वाहिन्यांना गळती लागली असून यामुळे गावात पाणी वाया जात आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी १२.२३ लक्ष मतदार

**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्हा परिषदेच्या ५७ जागांसाठी तसेच आठ पंचायत समितीच्या ११४ सदस्यांच्या आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १२.२३ लक्ष मतदार पात्र ठरले आहेत. १ जुलै रोजीच्या मतदार यादीची वैधता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ग्राह्य धरण्यात येणार असून जिल्ह्यातील लोकसभा क्षेत्रातील मतदार संख्येच्या ५१ टक्के मतदान जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी पात्र ठेवल्याचे दिसून आले आहे. सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पालघर जिल्ह्यातून २२.९२ लक्ष मतदार पात्र ठरले होते. तर १ जुलै २०२५ रोजी जिल्ह्यातील मतदार संख्या २३.९० लक्ष इतकी होती. दरम्यानच्या कालावधीत जिल्ह्यामध्ये ९७६९९ मतदार संख्या वाढली असून त्यापैकी वसई विधानसभा क्षेत्रात ४५ हजार, बोईसर विधानसभा क्षेत्रात २५ हजार मतदारांचा समावेश आहे. उर्वरित चार विधानसभा मतदारसंघात (वसई, डहाणू, पालघर, विक्रमगड) दरम्यानच्या नऊ महिन्यांच्या कालावधीत साडेपाच ते साडेआठ हजार मतदार वाढल्याचे दिसून आले आहे. जिल्हा परिषदेच्या ५७ गटांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी १२ लक्ष २२ हजार ९७९ मतदार पात्र ठरले असून पालघर तालुक्यातील १७ जागांसाठी तीन लक्ष ६३ हजार मतदार पात्र ठरले आहेत. डहाणू तालुक्यातून १३ जिल्हा परिषद गटांसाठी निवडणूक होणार असून तालुक्यातील २.९० लक्ष मतदार पात्र ठरले आहेत. उर्वरित तालुक्यांमध्ये तीन ते सहा सदस्यांची निवडणूक होणार असून या तालुक्यांमध्ये ५५ हजार ते ९६ मतदार पात्र ठरले आहेत. लोकसभा क्षेत्रातील मतदार संख्येचा विचार केल्यास जिल्ह्यातील सुमारे ११.६७ लक्ष मतदार (४९ टक्के) मतदार जिल्ह्याच्या शहरी भागात वास्तव्य करत असल्याचे मतदार संख्येच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे. जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात १५०१ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले असून पालघर तालुक्यात सर्वाधिक ४१५ मतदान केंद्र आहेत. डहाणू तालुक्यात ३७०, वाडा तालुक्यात १६६, विक्रमगड तालुक्यात १३१, जव्हार तालुक्यात १२७, तलासरी तालुक्यात १२१, वसई तालुक्यात १०२ तर मोखाडा तालुक्यात ६९ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

पान १ वरून....

## दारूड्या मुलाकडून नात्याची ...

आहे. यातील विशाल याला दारूचे व्यसन जडले होते. शरद विवाहानंतर आईवडिलांपासून वेगळा राहतो. तो कृषी केंद्र चालवतो. ६ नोव्हेंबरला रात्री विशाल दारू पिऊन घरी गेला. आई आणि वडील दोघेही गाढ झोपेत होते. निद्रिस्त अवस्थेतच मुलगा विशाल याने डोक्यावर आणि मानेवर धारदार कुऱ्हाडीने वार करून आईबापाला संपविले. त्यांचे घर मुख्य रस्त्यापासून काही अंतरावर असल्याने ओरडण्याचा आवाज कुणालाच आला नाही. गावात अंत्यविधीचा कार्यक्रम असल्याने सर्व गावकरी तेथे गेलेले होते. गुरुवारी सकाळी मोठा मुलगा शरद डुकरे हे कृषी केंद्रात बसलेले होते. आजोबा घर उघडत नाहीत म्हणून त्यांची मुले धावत आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. दरवाजा आतून बंद होता. ग्रामस्थांनी खिडकी तोडून आत प्रवेश केला असता सुभाष आणि लताबाई हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले व विशालचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. कंटाळून पत्नी गेली सोडून विशालच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून पत्नी काही वर्षापूर्वी सोडून गेली होती. भाऊसुद्धा त्याच्यापासून विभक्त राहू लागला. मुलासाठी आई, वडील काळजी करायचे. परंतु त्यांचेच हत्याकांड मुलाने घडविले. विशाल एवढा व्यसनाधीन झाला होता की तो कुणालाही दारूसाठी पैसे मागायचा. अनेकांकडे तगादा लावायचा. घरातील हाती लागेल ती वस्तू, धान्य विकून दारू प्यायचा. यामुळे कुटुंबीय वैतागले होते. घरचे शेतमाल विकण्याला विरोध करीत असल्याचा राग त्याच्या मनात होता. त्याच्या व्यसनाधीनतेमुळे तिघांचे बळी गेल्याचे गावकरी बोलत आहेत.

## संशयावरून संसाराची वाताहत झाली...

वरप गावातील विश्वजित प्रीअर्स या अलिशान सोसायटीत आपल्या दोन मुलांसह राहत होते. संतोष हा चालक आहे. त्याची पत्नी विद्या मुंबईमध्ये टाटा मोटर्समध्ये नोकरी करत होती. पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की मागील काही दिवसांपासून संतोष पोहळ हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता. त्यांच्यात या विषयावरून सतत वाद सुरू होते. पत्नी विद्या पतीचे आरोप फेटाळून लावत होती. पती तिला चारित्र्याच्या संशयावरून सतत त्रास देत होता. पत्नी विद्या हिच्या चारित्र्याच्या विषयावरून गुरूवारी रात्री पत्नी आणि पतीमध्ये जोराचे भांडण सुरू झाले. या वादाचे पर्यावसन हाणामारी आणि नंतर रागाच्या भरात संतोष पोहळ याने घरातील धारदार चाकूने पत्नी विद्यावर शिवीगाळ करत सपासप वार केले. विद्याने स्वताला वाचविण्याचा प्रयत्न केला. एकटीच असल्याने ती बचावात कमी पडली. त्याचा गैरफायदा घेत संतोषने तिला जागीच ठार मारले. पत्नी मृत्युमुखी पडताच संतोषने स्वतावर वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. या घटनेने वरप, म्हारळ परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच टिटवाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज गिरी, म्हारळ पोलीस चौकीचे पोलीस अधिकारी दत्तात्रय नलावडे आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहचले. या प्रकरणाची पोलीस अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी केली तेव्हा त्यांना वैवाहिक वाद आणि पत्नीच्या चारित्र्याच्या संशयावरून हा प्रकार घडला असल्याचे निदर्शनास आले. विश्वजित प्रीअर्स या उच्चभ्रंच्या सोसायटीत हा प्रकार घडल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अशाच पध्दतीने यापूर्वी टिटवाळा भागात गेल्या दोन वर्षात दोन ते तीन प्रकरणे घडली आहेत.

## अनैतिक संबंधाची अखेर पकडली ...

मृत्यू प्रकरणाचा छडा पोलिसांनी अवघ्या काही तासांत लावला. गुन्हे शाखाप्रमुख संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रमोदची पत्नी छाया आणि तिचा ३९ वर्षीय प्रियकर विश्वंभर दिगंबर मांजरे यांना अटक केली. मयत प्रमोद भलावी हा चंद्रपूरमध्ये खासगी काम करत होता, तर त्याची पत्नी छाया सात वर्षांपासून माहेरी अंजनगाव बारी येथे राहत होती. त्यांना दोन मुलं आहेत. प्रमोद दिवाळीपासून पत्नीच्या माहेरी राहत होता. वर्षभरापूर्वी घरातील कामाच्या निमित्ताने भेट झालेल्या मिस्त्री विश्वंभरच्या प्रेमात छाया आकंठ बुडाली. दोघांचे प्रेमसंबंध सुरु झाले. पण काही काळातच त्यात अडथळे येऊ लागले. आपल्या संबंधांची प्रमोदला कुणकुण लागली आहे. तो आणि एक महिला नातेवाईक मला दररोज त्रास देतात. त्यामुळे आता त्याचा काटा काढावाच लागेल असं छायाने विश्वंभरला सांगितलं. विश्वंभरने छायाला सांगितले की, तू पतीला सोबत घेऊन अंजनगाव बारीकडे निघ. मी आधीच जंगल परिसरात जाऊन लपतो. लघुशंकेचा बहाणा करुन थांबा, मग मी मागून त्याच्यावर वार करतो. ठरलेल्या योजनेनुसार १० नोव्हेंबर रोजी रात्री छाया दस्तूरनगर परिसरात थांबली. दोघंही तिथेच एका हॉटेलमध्ये जेवले. त्यानंतर नेरपिंगळाई येथे जाऊन देवीचं दर्शन घेतलं. संध्याकाळच्या सुमारास अमरावतीत परतल्यानंतर त्यांनी बाजारातून कोयता विकत घेतला. त्यानंतर छायाने पतीला फोन करून बोलावलं. प्रमोद रात्री दहा वाजताच्या सुमारास आपल्या दुचाकीने दस्तूरनगरला आला. जंगल परिसरात छायाने सू-सू लागल्याचा बहाणा करुन त्याला दुचाकी थांबवायला सांगितली.

दोघंही दुचाकीवरुन खाली उतरताच जंगलात आधीच दडून बसलेल्या विश्वंभरने प्रमोदच्या मानेवर कोयत्याने वार केले. प्रमोदचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर दोघांनीही त्याचा मृतदेह नाल्याशेजारी नेऊन टाकला. त्याची दुचाकीही तिथेच टाकली. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून दोघांनीही त्याच्या चेहऱ्यावर दगडाने अनेक वेळा घाव घातले. रात्री १०.५० वाजताच्या सुमारास दोघं अंजनगाव बारीला पोहोचले. छायाने प्रमोदचा मोबाइल स्वतःजवळ ठेवला, तर त्यातील सिम तोडून फेकून दिलं. प्रियकर रात्रभर छायाच्या घरी राहिला. ११ तारखेला ते गावी पोहोचले. आरोपी पत्नीनेच पतीच्या मिसिंगची तक्रार नोंदवली होती. मात्र पती नेमका कुणासोबत बाहेर पडला, याबाबत तिने चुकीची माहिती दिली. त्यामुळे तिच्यावरचा संशय बळावला. चौकशीदरम्यान तिच्या प्रेमसंबंधांची माहिती मिळाली. त्यानुसार दोघांनाही अटक केली असून दोघांनीही खुनाची कबुली दिल्याची माहिती गुन्हे शाखा प्रमुख संदीप चव्हाण यांनी दिली. पोलिसांनी घटनास्थळाहून गुन्ह्यात वापरलेला कोयताही जप्त केला आहे.

पान ८ वरून....

## वसईत अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी...

दिले जातील, अशी प्रतिक्रिया उपविभागीय अधिकारी शेखर घाडगे यांनी दिली. तर शासनाच्या निर्देशानुसार नागरिकांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी त्यांच्याकडील प्रकरणे जास्त काळ प्रलंबित न ठेवता तात्काळ न्याय दिला जाईल, अशी ग्वाही अपर जिल्हाधिकारी फटांगरे यांनी दिली. तसेच या कामात गती राखण्यासाठी त्यांनी उपस्थित वकिलांना सहकार्य करण्याचे आणि प्रकरणांमध्ये अनावश्यक तहकूबी (Adjournment) न मागण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी फटांगरे, उपविभागीय अधिकारी शेखर घाटगे, ज्येष्ठ वकील मोजेस रॉड्रिग्ज, ॲड. विल्यम फर्नांडिस, ॲड. भरत पाटील, ॲड. दर्शना त्रिपाठी यांच्यासह इतर वकील, पक्षकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडणूक विजयासाठी एकदिलाने काम...

करावी असे आवहान आ. निलंगेकर यांनी केले. निवडणुकीतील विजय मिळवण्यासाठी पक्षाने जी रणनीती आखली आहे त्यानुसार तर काम करायचे आहे. मात्र त्यापुढे जाऊनही नागरिकांची संपर्क साधत त्यांच्याशी सवांद करत आपला पक्ष व सरकारने केलेले काम त्यांच्यापर्यंत पोहचवा असे सांगत आ. निलंगेकर म्हणाले कि कमळ हाच उमेदवार असून पक्ष योग्य कार्यकर्त्याला संधी देईल असे स्पष्ट केले. त्यामुळे कमळाच्या विजयासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यानी पुढील २ महिने देऊन एकदिलाने व एकजुटीने कामाला लागावे असे आवहान केले.

मराठवाडा संघटना मंत्री संजय कौडगे यांनी मंडल अध्यक्ष व शक्तीकेंद्र प्रमुख यांच्याकडून आढावा घेत निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी मतदार यादीचे वाचन करत त्याचे वर्गीकरण करावे असे सांगितले. त्याचबरोबर मतदानाची टक्केवारी वाढवत ती वाढलेली टक्केवारी आपल्याला कशी मिळेल यासाठी कशा पद्धतीने काम करायचे याबाबत मार्गदर्शन केले. आगामी निवडणुकीच्या दृष्टीकोनातून बूथ पुनर रचनेचे काम पुर्ण झाले असल्याचे सांगत शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी बूथ मजबूत करून निवडणूक जिंकण्याची पायाभरणी केली असल्याचे सांगितले. या बैठकीतून निवडणूक जिंकण्याचे तंत्र व मंत्र प्रत्येकाला मिळाला असल्याचे सांगून निवडणूक जिंकण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील प्रत्येक उंबरठ्यापर्यंत पोहचावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या बैठकीतून प्रत्येकाने विजयाचा संकल्प करत आगामी काळात पक्षाच्या विजयाचे ध्येय समोर ठेऊन कामाला लागावे असे आवहान शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

निवडणूक जाहीर नसली तरी त्याची प्रक्रिया सुरु झाली असल्याचे सांगत शहर निवडणूक प्रमुख अर्चना पाटील चाकूरकर यांनी पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी असल्याचे सांगितले. इच्छुकांची वाढती संख्या म्हणजे पक्ष आणि पक्ष नेतृत्वावर विश्र्वास असल्याचे स्पष्ठ होत असून संख्या मोठी असली तरी पक्ष ज्याला उमेदवारी देईल त्याच्याच विजयासाठी आपण सर्वांनी मिळून कामाला लागावे असे आवहान अर्चना पाटील चाकूरकर यांनी केले.या बैठकीची सुरुवात भारत मातेच्या प्रतिमा पुजनाने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. बैठकीचे सुत्रसंचलन जिल्हा सरचिटणीस प्रविण कस्तुरे तर आभार प्रदर्शन निखील गायकवाड यांनी केले. या बैठकीस मंडल अध्यक्ष, शक्तीकेंद्र प्रमुख यांच्यासह पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वसई विकास सहकारी बँकेच्या नवीन...

वसई विकास सहकारी बँकेने आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बँकेच्या नविन अधिकृत वेबसाईट www.vvsb.bank.in वर यशस्वीरित्या स्थलांतर केले आहे आहे व ग्राहकांच्या सर्व बँकिंग गरजांसाठी कृपया ही लिंक वापरण्याचे आवाहन केले. बँकेचे चेअरमन आशय हरेश्वर राऊत यांनी बँकेचे संचालक मंडळ, कार्यकारी अधिकारी, एच.ओ.डी., आय.टी.टीम, सर्व बँक कर्मचारी आणि सॉफ्ट टेक सोल्यूशन्सच्या श्रीमती फिजा कपासी यांचे त्यांच्या टिमसह याप्रमुख नियामक अनुपालनामध्ये सहकार्य आणि टिमवर्क केल्याबद्दल मनापासून आभार मानले.

## वाडा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत...

आणि शिक्षकांसोबत संवाद साधला. तसेच प्रधानमंत्री जनमन घरकुल योजनेअंतर्गत घरकुल बांधकामांची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या गुणवत्तेचा आढावा घेतला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामविकास, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता, जलसंधारण, पोषण, तसेच सामाजिक सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्याचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. अभियानाच्या माध्यमातून 'समृद्ध ग्राम-समृद्ध जिल्हा' या ध्येयाकडे ठोस पावले टाकत असून, सर्व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांकडून या बैठकीत करण्यात आले.

## 'आकाशवाणी'वरील किस्से आणि ...

टिकवायची असेल तर आपण सगळ्यांनी असे साहित्य आणि सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे... आणि हे कार्य सातत्याने लोकनेते हितेंद्र ठाकूरांच्या नेतृत्वाखाली यंग स्टार्स ट्रस्टच्या माध्यमातून होत असते त्याबद्दल हितेंद्र आप्पांचे कौतुक करावे तेव्हढे कमीच आहे, असे ते म्हणाले. असे साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रम सातत्याने यंग स्टार्स ट्रस्टतर्फे राबविण्यासाठी समाज मंदीर ट्रस्टचे चेअरमन नितीन म्हात्रे आणि सर्व विश्वस्त मंडळ यांसारख्या वसईतील अनेक संस्था सहकार्य करत असतात, ह्यापुढेही त्यांच्या सहकार्याने असे कार्यक्रम राबविण्यात येतील अशी ग्वाही समन्वयक प्रकाश वनमाळी यांनी दिली.

कार्यक्रमास प्रकाशक अशोक मुळे, कार्याध्यक्ष मिलिंद म्हात्रे, वंदना वर्तक, हेमलता राऊत, चंदा वनमाळी, अरविंद म्हात्रे, उमेश पाटील, सुभाष चौधरी, संगीतोपचार तज्ञ प्रतिभा कुलकर्णी, कल्पक वर्तक, रंजना जैन यांसारखे वसईतील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना आणि सूत्रसंचालन मकरंद सावे यांनी तर आभार प्रदर्शन स्वाती जोशी यांनी केले.

## पालकमंत्री गणेश नाईक यांच्या 'जनता...

आहे. अशा सर्वच ठिकाणी भाजप कार्यकर्ते व पुढाऱ्यांकडून जागोजागी स्वागत फलक व भाजपचे मोठ्या प्रमाणात ध्वज लावण्यात आल्याचे चित्र दिसून आले. पालकमंत्री गणेश नाईकांच्या जनता दरबारात समस्या मांडण्यासाठी वसई विरारच्या विविध भागातून नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी तीनशेहून अधिक नागरीकांनी आपल्या समस्या मांडल्या. यात अवैध रिक्षाथांबे, बेकायदा मातीभराव, अपंगांचे प्रश्न, २०१७ पासून प्रलंबित असणारे परवाने, रस्त्यांची दुरुस्ती, पाणी प्रश्न, कांदळवनांचा ऱ्हास, पाणथळ जागांचा प्रश्न, कामण जिल्हापरिषद शाळेत शिक्षकांची कमतरता, स्मशानभूमींचे नूतनीकरण, नायगाव रेल्वे स्थानकालगतचे अनधिकृत पार्किंग, उद्यानांमधील निकृष्ट दर्जाची खेळणी, धूपप्रतिबंधक बंधारे अशा विविध समस्या जनता दरबारात प्रामुख्याने मांडण्यात आल्या. शुक्रवारी विरारमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात सामान्य नागरिकांसह भाजप नेते, कार्यकर्ते यांनीही मोठ्या संख्येने गर्दी केली होती. पण, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कमळाच्या चिन्हाचा बॅच लावून आणि गळ्यात भगवे वस्त्र घालून व्यासपीठावर भाजपच्या भावी नगरसेवकांनी केलेल्या गर्दीमुळे जनता दरबाराला कार्यकर्ता मेळाव्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. विरार येथे आयोजित जनता दरबारात येण्यापूर्वी आम्ही आचोळे येथे प्रस्तावित रुग्णालय, क्रीडानगरी, मजेठिया नाट्यगृह अशा विविध प्रलंबित प्रकल्पांची पाहणी केली आहे. तसेच शहरातील रस्त्यांची दुरुस्ती, वसई विरार शहराला अंतर्गत जोडणाऱ्या उड्डाणपुलांचे काम पूर्ण व्हावे म्हणून शासनस्तरावर आम्ही प्रयत्न करत आहोत. त्यामुळे शहरातील रखडलेले प्रकल्प लवकरच मार्गी लागणार असल्याची प्रतिक्रिया पालकमंत्री गणेश नाईक यांनी दिली. तसेच शासकीय अधिकारी नाहीत म्हणून लोकप्रतिनिधींनी जनतेला भेटू नये, असे काही नाही, असे वक्तव्य ही त्यांनी यावेळी केले.

## श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात...

सेवा प्राधिकरणमार्फत केले जात असल्याचे श्री. गिरवलकर यांनी सांगितले. तसेच भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार व राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्वे यावर मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पी. एम. खरोसेकर, एन.सी.सी. कमांडर संतोष नवगन व यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कुष्ठरोग निर्मूलनासाठी पालघर जिल्हा ...

व्यापक जनजागृतीद्वारे संसर्गाची साखळी खंडित केल्यास २०२७चे लक्ष्य साध्य होऊ शकते. बैठकीस सहाय्यक संचालक, मलेरिया (ठाणे विभाग) डॉ. सोनवणे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रामदास मरड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. साळुंखे यांसह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. खालील पद्धतीने राबविले जाणार अभियान - ग्रामीण भागातील १०० टक्के लोकसंख्येची प्रत्यक्ष तपासणी, शहरी भागातील ३० टक्के 'जोखीमग्रस्त' लोकांचे सर्वेक्षण, यासाठी आशा सेविका, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवक घराघरांत जाऊन तपासणी करतील. संभाव्य रुग्णांची तत्काळ नोंद, तपासणी व उपचाराची प्रक्रिया सुरु केली जाईल. या अभियानांतर्गत आरोग्य पथके घराघरांत भेट देऊन संभाव्य कुष्ठरुग्णांची ओळख पटवणार आहेत. लक्षणे आढळल्यास संबंधित व्यक्तींना तात्काळ तपासणी व उपचार प्रक्रिया उपलब्ध करून द्यावी, नागरिकांनी भीती न बाळगता तपासणीस सहकार्य करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी केले आहे.

# ‘पंढरपूर वारी’साठी वाडा येथून निघालेल्या एसटी बसमुळे वारकऱ्यांना प्रचंड मन:स्ताप

## दोन वेळा जाताना, तीन वेळा परतताना बस बिघाड!




**वाडा : वार्ताहर**

पंढरपूरची वारी करून पंढरपूरहून–ठाणे–वाडाकडे मार्गस्थ (पंढरपूरहून वाड्याकडे परतीच्या प्रवासाला निघालेल्या) झालेल्या वारकऱ्यांची पुणे– मुंबई एक्सप्रेस मार्गावर व नंतर शीळ फाटासह अन्य एका ठिकाणी एसटी बस तासोनतास बंद पडून राज्य परिवहन विभागाकडून कुठलीही तातडीने मदत उपलब्ध न झाल्याने १२ तासांचा प्रवास ३० तासांवर गेल्याची प्रचंड गैरसोय झाली आहे. वारकऱ्यांना विशेषतः महिला, जेष्ठ नागरिक, मुलांना याचा प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागला आहे. एसटी महामंडळाच्या नियोजनातील त्रुटीवर वारकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) निष्काळजीपणामुळे प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला असल्याने वारकऱ्यांनी एसटी महामंडळाच्या कारभारावर संताप व्यक्त करत थेट परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी तक्रार करून दोषीं आगार प्रमुखांवर व संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. वाडा तालुक्यातील सोनाळे, बिलघर, कळंभे, मोज येथील वारकरी संप्रदाय मंडळी ५० वर्षांपासून पंढरपूरची वारी करीत आहेत. ते काही दिवसांपूर्वी पंढरपूर वारीसाठी गेले होते. जाण्यासाठी ४२ प्रवाशांसाठी वाडा आगाराची एसटी बस तिकीट दरानुसार बुक करण्यात आली होती. हि बस वाड्यावरून मार्गस्थ झाल्यानंतर रस्त्यातच बंद पडली. त्यामुळे पंढरपूरला जाताना देखील दोन वेळा तर पंढरपूरहून परताना एसटी बस तीन वेळा बदलण्याची वेळ ओढवली असल्याचा कटु अनुभव रमेश जाधव या वारकऱ्यांनी सांगितले. यात बस उशिरा येणे, तांत्रिक बिघाड, मार्गात पुरेशी व्यवस्था नसणे आणि प्रशासनाकडून सहकार्याचा अभाव अशा कारणांमुळे ४२ वारकरी रस्त्यावर तासोनतास अडकून राहिले. दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी पंढरपूरहून परतीसाठी वाड्याकडे निघालेल्या ४२ वारकऱ्यांनी (महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मूल व पुरुष) चंद्रभागा बस स्थानकातून सकाळी ७:३० वाजताची ठाणे आगर क्र.१ ची असणाऱ्या एसटी बसने प्रवास सुरू केला. सकाळी ८:२० वाजता हि बस पुणे – मुंबई एक्सप्रेस (मार्गावर) पोहचल्यानंतर बंद पडली. चालक, वाहक आणि वारकऱ्यांनी ठाणे आगाराशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने बस जवळपास १२ तास रस्त्यातच अडकून पडली. यानंतर परिवहन मंत्र्याच्या कार्यालयाशी संपर्क साधून रात्री १० वाजता तळेगाव आगारातून बस उपलब्ध झाल्यानंतर ११:३० वाजता बस वाड्याच्या दिशेकडे निघाली. मात्र सदर बस रात्री १:३० वाजता ठाणे – कल्याण मार्गावरील शीळ फाटा येथे पुन्हा बंद पडली. यावेळी ठाणे क्र.१, कल्याण व विठ्ठलवाडी आगार प्रमुख सोबतच ठाणे विभागीय व्यवस्थापकांना संपर्क साधला असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नसल्याने आम्हा वारकऱ्यांना उपाशी पोटी व रस्त्यातवरच रात्र घालवावी लागली असल्याचे वारकऱ्यांकडून सांगण्यात आले. अखेर दुसऱ्या दिवशी (०७ नोव्हेंबर) पहाटे ५:३० वाजता वाडा आगाराचे वाहतूक नियंत्रक रघुनाथ मिसाळ यांनी विठ्ठलवाडी आगाराशी संपर्क साधत बस उपलब्ध करून दिली. त्यानुसार वारकरी सुखरुप घरी परतले. पंढरपूरहून – ठाणे – वाडा निघालेली एसटी गाड्या अर्ध्या रस्त्यात बंद पडल्या. त्या गाड्यांना दुरुस्तीकरिता तांत्रिक विभागाकडून, ठाणे विभागीय व्यवस्थापक, नियंत्रकाकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नसल्याचे वारकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे या मार्गांवरील वारकऱ्यांचा प्रवास हा अत्यंत वेदनादायी (कष्टदायक) ठरला. वाडा आगारातून पंढरपूर करिता ४८ एसटी बसेस बुक करण्यात आल्या होत्या. परंतू महामंडळाने वारीच्या दिवसांसाठी विशेष आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करण्याची पूर्वतयारी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. या गैरसोयीबाबत वारकऱ्यांच्या प्रतिनिधींनी परिवहन मंत्र्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत म्हटले आहे की, वारकरी प्रवाशांना झालेल्या मनःस्ताप व गैरसोयीबद्दल चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच पुढील वर्षी चांगल्या व सुस्थितीत एसटी बसेस उपलब्ध करून द्याव्यात.

कोणतेही वाहन मार्गस्थ बिघाड झाल्यास कोणतीही सूचना मिळताच संबंधित वाहन हे तात्काळ प्रभावाने अटेंड करून प्रवाशांची गैरसोय टाळावी. याबाबत संबंधित आगार वव्यवस्थापकांना सक्त आदेश दिले आहेत. बिघाड झालेले वाहन हे सीएनजी प्रकारातील असल्यामुळे व पंढरपूर वारी करीता कर्मचारी हे मार्गावर (फोकल पॉईंट) असल्याने वाहन दुरुस्ती करिता यंत्र कर्मचारी यांची उपलब्धता वेळेवर झाली नाही. यंत्र अभियंता विवेक लोंढे यांच्याकडून अधिक माहिती प्राप्त होईल, असे राज्य परिवहन विभागाचे ठाणे विभागीय नियंत्रक सागर पळसुळे यांनी सांगितले, तर वारकऱ्यांना एसटी बसची सेवा तांत्रिक समस्येमुळे मिळाली नाही याची नुकतीच माहिती मिळाली. वरिष्ठ कार्यालयाकडून तक्रारी अर्ज चौकशी करिता आल्यावर त्याची चौकशी करण्यात येईल, त्यानुसार दोषींवर कारवाई होईल, असे वाडा आगार व्यवस्थापक भूषण बेंद्रे यांनी सांगितले.

# बनावट आयकर अधिकारी बनून महिलेला घातला ५५ लाखांचा गंडा

**बोईसर : वार्ताहर**

आयकर अधिकारी असल्याची बतावणी करून आपल्या साथीदारांसह घरात धाड टाकत एका महिलेला लाखो रुपयांचा गंडा घालणाऱ्या तोतया आयकर अधिकाऱ्याला अटक करण्यात बोईसर पोलिसांना यश आले. याप्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून काही फरार आरोपींचा पोलिसांमार्फत शोध सुरू आहे. बोईसर जवळील मान येथे राहणाऱ्या एका व्यक्तीच्या घरात लाखो रुपयांची रोख रक्कम असल्याची माहिती आरोपीला त्याच्या साथीदारामार्फत मिळाली होती. त्यानुसार प्रमुख आरोपी फैयाज काझी उर्फ मनीष पावसकर व त्याच्या साथीदारांनी घरामध्ये महिलेचा पती नसल्याची संधी साधत पत्नी व मुले यांना आपण आयकर विभागाचे अधिकारी असल्याची बतावणी केली, तुमच्या घरात गैरमार्गाने मिळवलेली मोठ्या प्रमाणात बेहिशोबी रोकड असल्याची भीती दाखवली तसेच आयकर विभागाचे बनावट ओळखपत्र दाखवून महिलेचा मोबाईल आपल्या ताब्यात घेतला. आरोपींनी आयकर विभागाची धाड पडल्याचे सांगत फिर्यादीच्या घरातील कपाटात असलेले ५५ लाख ८० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. या प्रकरणी महिलेने बोईसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, सहाय्यक पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांनी तपासा बाबत मार्गदर्शन केले पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक केशव राठोड, उपनिरीक्षक चंद्रकांत हाके यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून बोईसर चिल्हार रस्ता, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, मनोरवाडा भिवंडी महामार्ग परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण आणि तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तोतया आयकर अधिकारी फय्याज कादर काझी उर्फ मनीष पावसकर हा मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे राहणारा असून पोलिसांनी या प्रमुख आरोपीला अटक करण्यात यश मिळवले आहे. आरोपीकडून २३ लाख ७० हजारांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात प्रमुख आरोपीचे इतर साथीदार हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

# रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्याबाबत वसई-विरार पालिकेचे नागरिकांना आवाहन

**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहर महानगरपालिका आणि पशुसंवर्धन विभाग, वसई तसेच विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने वसई विरार शहर महापालिका क्षेत्रात तसेच पालघर जिल्हा कार्यक्षेत्रात भटक्या श्वानांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्याबाबत महापालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे. प्राण्यांची काळजी, आहार आणि कल्याण यामध्ये सहभागी असलेल्यांनी तसेच स्वयंसेवक, सामुदायिक कार्यकर्त्यांनी, निवासी सोसायटी ज्यांना त्यांच्या श्वानांचे लसीकरण करायचे आहे, त्यांनी ‘रेबीजमुक्त वसई-विरार’ मोहिमेसाठी सहकार्य करण्याची विनंती प्रशासनामार्फत करण्यात आली आहे. यासाठी सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त होणारा फॉर्म भरावा लागेल. ह्या फॉर्ममधील तपशील संबंधित स्वयंसेवी संस्थांना पाठविण्यात येतील व संस्थेमार्फत भटक्या श्वानांच्या लसीकरणासाठी संबंधित अर्जदारास संपर्क साधण्यात येईल. रेबीज हा एक प्राणघातक आजार आहे. हा आजार प्रथमोपचार, लसीकरण आणि रेबीज इम्युनोग्लोबुलीनच्या मदतीने टाळता येतो. रेबीजमुळे दरवर्षी १५० हून अधिक देशांमध्ये




अंदाजे ५९ हजार मानवी मृत्यू होतात, ज्यापैकी ९५% प्रकरणे आफ्रिका आणि आशियामध्ये आढळतात. बऱ्याचशा मृत्यूंचे कारण हे या आजाराबद्दल तसेच संसर्गानंतरच्या उपचार पद्धतीबद्दल नागरिकांना माहिती नसणे हे आहे. रेबीज आजार होण्यामागील प्रमुख घटक म्हणजे लसीकरण न केलेले भटके श्वान किंवा रस्त्यावरील श्वान. रेबीज आजाराशी लढण्यासाठी आणि २०३० पर्यंत त्याचे पूर्णपणे उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवून राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, दिल्ली यांनी रेबीज निर्मुलनासाठी राष्ट्रीय कृती योजना (NAPRE) ची संकल्पना मांडली. देशात नियमितपणे श्वानांचे लसीकरण करणे आणि संसर्गानंतर उपचारांद्वारे रेबीज हळूहळू कमी करणे आणि शेवटी पूर्णपणे नष्ट करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. यासंदर्भात मिशन रेबीज क्र. ९८३४१७७२६६ या क्रमांकावर संपर्क साधून अधिक माहिती प्राप्त करून घेता येईल.

# चौथ्या स्वर्गीय किरण दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेत जे.जे. स्पोर्ट्स विजयी

**जळगाव : वार्ताहर**

चौथ्या स्वर्गीय किरण दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज (दि.९) ला अनुभूती निवासी स्कूलच्या क्रीडांगणावर खेळविण्यात आला. त्यात जे. जे. स्पोर्ट्स हा अंतिम विजयी होऊन त्यांनी ४था किरण दहाड चषक उंचावला. स्वर्गीय किरण दहाड स्मृती टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे ३० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले होते. स्व. किरण दहाड स्मृती टी-२० स्पर्धेचे चौथ्या वर्षी १६ संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. अंतिम सामना जैन स्पोर्ट्स अकादमी ब्ल्यू विरुद्ध जे जे स्पोर्ट्स क्लब दरम्यान झाला. या अंतिम सामन्याची नाणेफेक जे जे स्पोर्ट्स क्लब ने जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला जे जे स्पोर्ट्स क्लब नये आपल्या निर्धारित २० षटकांमध्ये सात गडींच्या मोबदल्यात एकूण १३३ धावा केल्यात. जे जे स्पोर्ट्स तर्फे संदेश सुरवाडे याने ३४ (२६) कैलास पाटील यांनी ३२ (१८) अशा वैयक्तिक धावा करून आपल्या संघाला १३३ धावसंख्या उभारण्यास मदत केली. जैन स्पोर्टसतर्फे राज बेलदार याने चार षटकात २१ धावा देत ३ महत्त्वपूर्ण बळी मिळविले. १३४ धावांचे लक्ष्य घेऊन उतरलेल्या जैन स्पोर्ट्स अक्ॅडमी ला आपल्या निर्धारित २० षटकात केवळ १३१ धावा करत्या आल्यात. त्यामुळे त्यांनी हा अंतिम सामना केवळ दोन धावांनी गमावला त्यांच्यातर्फे मोहम्मद नुमान याने ४४ (४०) धावा केला तर पवन पाटील यांनी ३४ (२०)



धावा करून आपल्या संघाला स्पर्धेत ठेवले होते. परंतु जे जे स्पोर्ट्स तर्फे मिलिंद सपकाळे याने ४ षटकार २३ धावा देत ३ बळी मिळविले तर कर्णधार रोहित पारधी याने ४ षटकात १९ धावा देत २ महत्त्वपूर्ण बळी मिळवून अटीतटीच्या सामन्यात आपल्या संघाला निसटता विजय मिळवून दिला. अंतिम सामन्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारोहाचे आयोजन केले होते. यासाठी जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष युसूफ मकरा, सचिव अरविंद देशपांडे तर जिल्हा निवड समितीचे प्रमुख अमळनेरचे संजय पवार व निवड समिती सदस्य प्रशांत विरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्वप्रथम अंतिम सामन्यात ज्याने फलंदाजी करताना २३(३१) धावा व गोलंदाजीत २ बळी मिळवून आपल्या संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला अशा कर्णधार रोहित पारधी याला सामनाविराचा चषक देण्यात आला. वैयक्तिक बक्षीसांमध्ये उत्कृष्ट फलंदाज म्हणून आर टी स्पोर्ट्सचा रोहित तलरेजा ज्याने तीन डावात एका शतकासह एकूण १६८ धावा केल्या याला ट्रॉफी व रोख १ हजार बक्षीस देण्यात आले. तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जेंट्स स्पोर्ट्स अक्ॅडमी चा राज बेलदार ज्याने चार सामन्यात सात बळी घेतले. याला ट्रॉफी व १००० रोख असे बक्षीस देऊन गौरवण्यात आले. मालिकावीर हे पारितोषक जे जे स्पोर्टचा कर्णधार रोहित पारधी ज्याने चार डावात ६० धावा केल्या व ९ बळी मिळविले याला ट्रॉफी व ३ हजार देऊन गौरविण्यात आले. उपविजेता जैन स्पोर्ट्स अक्ॅडमी च्या ब्ल्यू संघाला चषक व रोख १५००० असे बक्षीस देण्यात आले. तर जे जे स्पोर्ट्स क्लब यांना विजेते पदाची ट्रॉफी व रोख २५००० असे बक्षीस देण्यात आले. मोहम्मद फजल यांनी सूत्रसंचालन केले. मुस्ताक अली यांनी आभार मानले.

# वसई विरारमधील विविध ठिकाणी गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर छापा

**वसई : वार्ताहर**

वसई विरार शहरात जंगल परिसर यासह विविध ठिकाणच्या भागात छुप्या मार्गाने गावठी दारूच्या हात भट्ट्या लावण्याचे प्रकार सुरूच आहेत. नुकताच विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष ४च्या पथकाने विरार बरफपाडा येथे छुप्या मार्गाने सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्टीच्या अड्ड्यावर छापा मारून कारवाई केली आहे. वसई विरार शहरात विविध ठिकाणी छुप्या मार्गाने जंगल परिसर व कांदळवन भागात दारूच्या हात भट्ट्या लावल्या जात आहेत. त्यातून निर्माण होणारी गावठी दारू ही विविध ठिकाणी वितरित केली जात आहे. दिवसेंदिवस गावठी दारू हातभट्टीचे अड्डे वाढत आहेत. अशा बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी पथके नियुक्त केली



आहेत. नुकताच विरार पूर्व येथील बरफ पाडा, लहानगेपाडा समाज मंदिरा जवळील एका शेतात सुरु गावठी दारूची हातभट्टी लावण्यात आली होती. याची माहिती गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष ४ च्या पथकाला मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने त्याठिकाणी छापा टाकून कारवाई केली आहे. कारवाई मध्ये १ लाख ५३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात ३ हजार लीटर नवसागर गूळ मिश्रित रसायन, २५ लीटर गावठी दारू आणि ती तयार करण्याची साधने यांचा समावेश आहे. या प्रकरणी एका महिला आरोपीच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब) (क) (ड) (फ) (ई) प्रमाणे गुन्हा विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा कक्ष १ चे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत गांगुर्डे, दत्तात्रय सरक, संतोष मदने, शिवाजी पाटील, धनंजय चौधरी, संदीप शेरमाळ, सुप्रिया टीवले आदींच्या पथकाने केली आहे. यापूर्वी मांडवी पोलिसांनी पारोळ आणि खार्डी कोशिंबे येथील जंगलात धाडी टाकून गावठी दारूच्या हातभट्ट्या उध्वस्त केल्या होत्या. यात हजारो लीटर दारूचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला होता. तर नायगाव पोलिसांनीही पाणजू बेटावर बेकायदेशीरपणे सुरू असणाऱ्या गावठी हातभट्टीवर कारवाई केली होती. या कारवाईत १५० लीटर गावठी तयार दारु, १६२ ड्रम्समध्ये ३२ हजार ४०० लीटर वॉश, सत्तेले व इतर सामग्री असा १७ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

# जिल्हा परिषद पालघर येथे पंडित जवाहरलाल नेहरू जयंती साजरी



**पालघर : वार्ताहर**

जिल्हा परिषद पालघर येथे आज पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहपूर्वक साजरी करण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे आणि प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते यांनी नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आधुनिक भारताची पायाभरणी केली. विज्ञान-तंत्रज्ञान, औद्योगिक विकास, शिक्षण आणि लोकशाही मूल्ये यावर त्यांनी विशेष भर दिला. मुलांवरील प्रचंड प्रेमामुळेच त्यांना चाचा नेहरू अशी ओळख मिळाली आणि त्यांचा वाढदिवस ‘बालदिन’ म्हणून देशभर साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. विविधतेत एकता आणि प्रगत भारताचे स्वप्न पुढे घेऊन जाणाऱ्या नेहरूंच्या विचारांची आजही प्रेरणा देणारी परंपरा कायम आहे.अशा थोर व्यक्तीची जयंती आज जिल्हा परिषद पालघर येथे साजरी करण्यात आली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) इजाज अहमद शरीक मसलत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) अशोक पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर, जिल्हा कृषी विकास अधिकारी सोमनाथ पिंजारी, अधिकारी उपस्थित होते.

# बालदिनानिमित्त चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन; २५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**वसई : वार्ताहर**

दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी नशामुक्त भारत अभियानांतर्गत, मेरा युवा भारत, भारत सरकार, जिल्हा परिषद पालघर समाजकल्याण विभाग, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि निसर्गप्रेमी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बालदिनानिमित्ताने चित्रकला व रांगोळी स्पर्धा २०२५ चे आयोजन सह्याद्री शिक्षण सेवा मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय जूचंद्र तालुका वसई जिल्हा पालघर येथे आयोजित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूविरोधी मानसिकता निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ व व्यसनमुक्ती या विषयावर चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सह्याद्री शिक्षण सेवा मंडळाचे शाळांच्या २५० विद्यार्थीनींनी सहभाग घेतला



होता. चित्रकला व रांगोळी बक्षीस वितरण समारंभ ला प्रमुख पाहुणे नायगाव पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक प्रकाश आवारे, राकेश सुतार सह्याद्री शिक्षण सेवा मंडळाचे मुख्याध्यापक डॉ. विरक्षी भोईर प्राचार्य श्री. कीर्तीकुमार पाटील नशामुक्त भारत अभियान चे सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक श्री मिलिंद रूपचंद पाटील, निसर्गप्रेमी प्रतिष्ठान चे अध्यक्ष सागर घायाळ, स्पर्धेचे परीक्षक करण वाटार शिक्षक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक गौरी शर्मा, द्वितीय क्रमांक दैविक राऊत, तृतीय क्रमांक अनुराधा तर रांगोळी स्पर्धात प्रथम क्रमांक नंदनी, द्वितीय क्रमांक निधी साटम, तृतीय क्रमांक विधी पाटील या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निसर्गप्रेमी प्रतिष्ठानचे सदस्य निलेश वाघमारे, कृष्णा गौड, हर्षित संगठिया यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाची सांगता तंबाखू मुक्त ची शपथ घेऊन करण्यात आली.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय विरार पश्चिम**

**प्रथम वेळ जाहीर ई-निविदा सूचना**

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील खालील उल्लेखीत कामाचे कोरे निविदा फॉर्म http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १५/११/२०२५ पासून उपलब्ध होणार आहेत. ई टेंडरिंगबाबत अधिक माहितीसाठी पाणीपुरवठा विभाग, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार मुख्यालय येथे संपर्क साधावा.

१) वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पुर्व येथील फुलपाडा संप जवळील विविध प्रणालींना शेड उभारणे.

जावक क्र.: वविशम/पापु/८९१/२०२५

दिनांक : १४/११/२०२५

सही/-

**(सुरेंद्र ठाकरे)**

प्र. कार्यकारी अभियंता

वसई-विरार शहर महानगरपालिका

## वसईत अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी न्यायालयाचा शुभारंभ



**वसई : वार्ताहर**

वसई तालुक्यातील महसुली प्रकरणांतील अपीलांची सुनावणी वसईतच व्हावी याकरिता गुरुवारी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी न्यायालयाचा सुरुवात करण्यात आली. या न्यायालयामुळे वसईतील महसुली प्रकरणांना गती मिळून सर्वसामान्यांना न्याय त्वरित मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गेल्या काही काळात वसईतील महसूली प्रकरणात लक्षणीय वाढ झाली आहे. पण, या प्रकरणांच्या सुनावणीसाठी नागरिकांना जव्हार येथील अपर जिल्हाधिकारी मुख्यालयात पायपीट करावी लागत होती. त्यामुळे अपर जिल्हाधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस वसई तालुक्यात येऊन येथील महसुली अपिलांची सुनावणी घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक यांनी यासंबंधीचे निवेदन ही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर केले होते. तर या मागणीची दखल घेत महसूल मंत्र्यांनी दिलेल्या आदेशानुसार गुरुवार १३ नोव्हेंबर रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी न्यायालय सुरु करण्यात आले आहे. यावेळी बोलताना, महसुली अपिलांची प्रलंबित संख्या कमी करण्याचे आमचे प्रयत्न सुरू असून लवकरात लवकर प्रकरणांचे निर्णय ...पान ६ वर

# निवडणूक विजयासाठी एकदिलाने काम करत विरोधकांच्या अकार्यक्षमतेचा पंचनामा करा-आ.संभाजी पाटील निलंगेकर

**लातूर : वार्ताहर**

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून लातूर शहरासह जिल्ह्याच्या विकासाला मोठ्या प्रमाणात निधी मिळत असून कामांना गती मिळालेली आहे. मात्र विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधीने आपले कर्तव्य विसरत सरकारवर खापर फोडण्याचे काम केले आहे त्यामुळे विरोधकांच्या अकार्यक्षमतेचा पंचनामा करत आगामी मनपा निवडणूक जिंकण्यासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम करत पक्षाचा झेंडा फडकावा असे आवहान जिल्हा निवडणूक प्रभारी तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले आहे. आगामी मनपा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँकेत पक्ष पदाधिकारी व शक्तीकेंद्र प्रमुखांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर सरचिटणीस संजय गीर, रागिणी यादव, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे आदींची उपस्थिती



होती. लातूर शहरासह जिल्ह्याचा विकास करत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी काम केले असल्याचे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकार निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देऊन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी विरोधकांच्या अकार्यक्षमतेचा पाढा वाचून दाखवला. विरोधकांकडून विकासाचे किंवा जनतेच्या हिताचे कोणतेच काम झाले नाही याची आठवण करून देत विरोधी असलेल्या लोकप्रतिनिधीना आपल्या कर्तव्याचा विसर पडला असल्याचे सांगितले. मात्र आपली अकार्यक्षमता लपवण्यासाठी त्यांच्याकडून सरकारवर खापर फोडण्याचे काम सुरु असून त्यांनी लोकांमध्ये संभ्रम निर्माण केल्याचे सांगितले. विरोधकांच्या या अकार्यक्षमतेचा पंचनामा करण्यासाठी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आत एकदिलाने काम करत शहरातील विविध ठिकाणी पंचनामा सभा आयोजित ...पान ६ वर

## वसई विकास सहकारी बँकेच्या नवीन सुरक्षित बँकिंग डोमेनचे उद्घाटन




**वसई : वार्ताहर**

वसई विकास सहकारी बँकेने ११ नोव्हेंबर २०२५ रोजी नविन सुरक्षित बँकिंग डोमेन vvsb.bank.in च्या अधिकृत लाँचसह डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासात एक महत्वाचा टप्पा गाठला. हा उपक्रम २२ एप्रिल २०२५ रोजीच्या आरबीआयच्या परिपत्रकाचे पूर्णपणे पालन करतो. वसई विकास सहकारी बँकेच्या या नविन सुरक्षित बँकिंग डोमेन wsb.bank.in लॉचिंगच्या कार्यक्रम प्रसंगी बँकेचे चेअरमन आशय हरेश्वर राऊत यांनी सांगितले कि, आपल्या बँकेने नेहमीच विश्वास आणि पारदर्शकतेला प्राधान्य दिले आहे. तसेच या नविन vvsb.bank.in डोमेनमुळे डिजिटल सुरक्षा आणि अनुपालनात पुढे राहण्याच्या आमच्या वचनबद्धतेची ही साक्ष आहे. ही सेवा आपल्या बँकेच्या ग्राहकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी आणि आपल्या बँकेच्या डिजिटल सेवांवरील ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी आमच्या प्रयत्नांना बळकटी देतो. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप ठाकूर म्हणाले कि, वसई विकास सहकारी बँकेसाठी हा अभिमानाचा क्षण आहे. नविन डोमेन केवळ एक नियामक आवश्यकता नाही तर आधुनिक, सुरक्षित आणि ग्राहक केंद्रित डिजिटल बैंकिंगकडे एक धोरणात्मक पाऊल आहे. मी आमच्या आयटी व सायबर सुरक्षा टिमना त्यांच्या परिश्रम आणि महत्वाच्या टप्प्याच्या प्रशंसनीय अंमलबजावणीबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. बँकेचे ए.जी.एम. आय.टी. सीसो अशोककुमार तिवारी यांनी सांगितले कि, आजची कामगिरी केवळ तांत्रिक सुधारणेपेक्षा जास्त आहे. ती वसई विकास सहकारी बँकेची सायबर सुरक्षा, नियामक पालन, आणि डिजिटल लवचिकतेसाठी सतत वचनबद्धता दर्शवते. मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी म्हणून मी आमच्या ग्राहकांना आणि भागधारकांना आश्वासन देतो कि, आम्ही आमच्या प्रणाली आणि ग्राहकांच्या डेटाचे संरक्षण करण्यासाठी सर्वोत्तम सायबर सुरक्षापद्धती आणि प्रगत डिजिटल उपायांचा अवलंब करत राहू. बँकेचे चेअरमन आशय हरेश्वर राऊत यांनी बँकेच्या सर्व ग्राहकांना सांगितले कि, ...पान ६ वर

## वाडा येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाबाबत आढावा बैठक

**पालघर : वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वाडा पंचायत समिती येथे १२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या वतीने महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) अशोक पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारस्कर, गटविकास अधिकारी वाडा वैभव शिंदे तसेच वाडा तालुक्यातील अधिकारी उपस्थित होते.



समृद्ध पंचायत राज अभियानात सहभागी होऊन प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या विकासाचे मॉडेल तयार करावे. जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी व्हावे आणि राज्यस्तरावरील पुरस्कार प्राप्त करून जिल्ह्याचे नाव गौरवाने उजळवावे. असे प्रतिपादन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी केले. बैठकीदरम्यान तालुका स्तरावरील विविध विभागांच्या विकास कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सर्व प्रलंबित विकासकामांना प्रशासकीय मान्यता देऊन गती द्यावी, तसेच आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणतेही नवीन काम हाती घेऊ नये. त्यांनी पुढे म्हटले की, कामांची गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी हीच खरी प्रगतीची ओळख आहे. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम करणे आवश्यक आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनीही सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून या अभियानात जास्तीत जास्त ग्रामपंचायतींना सहभागी करून घेऊन तालुका आणि जिल्हास्तरावर पुरस्कारप्राप्तीचे लक्ष्य साध्य करावे, असे आवाहन अधिकाऱ्यांना केले. आढावा सभेनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी वाडा तालुक्यातील भुजडपाडा शाळा आणि अंगणवाडी केंद्राला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली, तसेच विद्यार्थी ...पान ६ वर

## श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात राष्ट्रीय विधी सेवा दिन उत्साहात संपन्न



**लातूर : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या समान कार्यक्रमानुसार लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय विधी सेवा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूर शहरातील जवळपास ११ विद्यालये व महाविद्यालयातील सुमारे २५० एनसीसी कॅडेट उपस्थित हजर होते. या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी मार्गदर्शन केले. समाजातील वंचित, गरीब व शोषित घटकांना मोफत व निष्पक्ष न्याय मिळावा, या हेतूने राष्ट्रीय विधी सेवा कायदा १९८७ पारीत करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी ०९ नोव्हेंबर १९९५ पासून करण्यात येत आहे. त्यामुळे म्हणून दरवर्षी ०९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय विधी सेवा दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या तीन स्तरावर वंचित, गरीब व शोषित घटकांना मोफत व निष्पक्ष न्याय देण्याचे कार्य विधी ...पान ६ वर

## कुष्ठरोग निर्मूलनासाठी पालघर जिल्हा प्रशासन १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत राबवणार शोधमोहीम



**पालघर : वार्ताहर**

२०२७ पर्यंत 'कुष्ठरोगाचा शून्य प्रसार' हे लक्ष्य गाठण्यासाठी पालघर जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून यासाठी १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरुग्ण शोधमोहीम राबविण्यात येणार असून तयारीचा आढावा घेण्यासाठी कुष्ठरोग शोधमोहीम समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत सहायक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. संदीप निंबाळकर यांनी जिल्ह्यातील राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचा आढावा घेत सविस्तर माहिती सादर केली. आगामी शोधमोहीमेचे स्वरूप, मैदानातील स्थिती आणि आवश्यक नियोजन समितीसमोर मांडण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांनी कुष्ठरुग्णांचे लवकर निदान आणि उपचार ही आजच्या घडीची सर्वात मोठी गरज आहे. सर्व विभागांनी तसेच जनतेने प्रशासनाला सहकार्य करावे. समाजातून कुष्ठरोग निर्मूलनासाठी एकत्रितपणे प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन केले. पुढे म्हणाले, ...पान ६ वर

## 'आकाशवाणी'वरील किस्से आणि हास्यकविताने रंगला ७३वा विवाकट्टा!



**वसई : वार्ताहर**

यंग स्टार्स ट्रस्ट आणि समाज मंदिर ट्रस्ट, वसई यांच्या संयुक्त विद्यमाने, दिवाळी विशेष विवा कट्टा, पुष्प ७३वे समाज मंदिर सभागृह, वसई येथे आयोजित करण्यात आले होते. या कट्ट्यावर ज्येष्ठ कवी, ब्रॉडकास्टर डॉ. महेश केळुसकर यांनी आकाशवाणीवरील किस्से व हास्यकविता असलेला त्यांचा झिणझिणाट हा कार्यक्रम सादर केला. डॉ. केळुसकरांसोबत माजी महापौर नारायणराव मानकर, वसई विकास बँकेचे माजी चेअरमन जगदीश राऊत, सोमवंशी क्षत्रिय समाज महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र राऊत, समाज मंदिर ट्रस्टचे मॅ.ट्रस्टी केवल वर्तक, यंग स्टार्स ट्रस्टचे समन्वयक प्रकाश वनमाळी इ. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आपल्या ३७ वर्षांच्या आकाशवाणीच्या काळात आलेल्या विविध रंगी अनुभव कथन केले तर अनेक मालवणी भाषेतील हास्यकविता, विडंबनकाव्य सदर करीत प्रेक्षकांमध्ये हास्याची कारंजी उधळली. हा गुलाब नाही हृदय तुला मी देतो... अस संवेदनशील कवितेबरोबरच, समाजातील अनेक विसंगतीवर, दांभिकतेवर प्रहार करणारी चिरीमिरी ही कविता आपल्या खुमासदार शैलीत सादर केली.सरतेशेवटी त्यांच्या झिणझिणाट या सुप्रसिद्ध कवितेने कार्यक्रमाची सांगता केली. मराठी भाषा, मराठी संस्कृती यासोबतच वसईची परंपरा ...पान ६ वर

## पालकमंत्री गणेश नाईक यांच्या 'जनता दरबारा'त इच्छुक उमेदवारांची गर्दी

**वसई : वार्ताहर**

आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर वसई विरार शहरातील राजकीय वातावरण बोचऱ्या थंडीतही चांगलेच तापले आहे. सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीची मोर्चेबांधणी करीत आहेत. दरम्यान, विरार येथे पालकमंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबाराचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले असता भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी या संधीचा फायदा घेतला. जनता दरबाराच्या निमित्ताने नाईक हे शहरात येणार असल्याने त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात स्वागत फलक व भाजपचे ध्वज लावण्यात आले. तसेच जनता दरबाराच्या ठिकाणी सुद्धा भाजप पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती असल्याने जनता दरबाराला सुद्धा भाजप मेळाव्याचे स्वरूप आल्याचे चित्र होते. एकंदरीतच या कार्यक्रमाच्या माध्यमातून भाजपकडून शक्ती प्रदर्शन करण्यात आले आहे. लोकसभा आणि विधानसभा




निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर भाजप नेत्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. विकासकामांचे उद्घाटन, विविध पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांचे सुरू असणारे पक्षप्रवेश यांच्या माध्यमातून भाजप पक्षाने वसई विरारमध्ये मोर्चेबांधणी सुरू केली आहे. तर येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत भाजपचे स्थान अढळ करण्यासाठी राज्यस्तरीय नेत्यांचे दौरे ही शहरात सुरू झाले आहेत. पक्षसंघटना मजबूत करणे आणि नागरिकांशी थेट संपर्क वाढवणे या उद्देशाने भाजपने विशेष रणनीती आखली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षातील वरिष्ठ नेते तथा मंत्री शासन आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत जनता दरबार आयोजित करत आहेत. शिवसेना (शिंदे गट) नेते व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या जनता दरबारानंतर शहरात पहिल्यांदाच वनमंत्री तथा पालकमंत्री गणेश नाईक यांचा जनता दरबार शुक्रवारी विरार येथे पार पडला. जनता दरबाराच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानक, मुख्य रस्ते व ज्या मार्गाने त्यांचा ताफा जाणार ...पान ६ वर

## मुंबई क्रिकेट असोशिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांचे विरार कनेक्शन

**विरार : वार्ताहर**

मुंबई क्रिकेट असोशिएशनचे बिनविरोध निवडून आलेले नवनिर्वाचित अध्यक्ष अजिंक्य राणे यांचे विरारशी कनेक्शन असून ते विरारच्या माजी आमदार आणि बहुजन विकास आघाडीचे सर्वोसर्वा हितेंद्र ठाकूर आणि मुंबई क्रिकेट असोशिएशनचे माजी उपाध्यक्ष पंकज ठाकूर यांचे जावई आहेत. तर माजी आमदार क्षितिज ठाकूर हे त्यांचे मेव्हणे आहेत. हितेंद्र टाकुन यांचे राजकीय वजन आणि पंकज ठाकूर यांचे मुंबई क्रिकेट असोशिएशन मधील शरद पवार यांच्या जवळच्या संबंधाचा उपयोग अजिंक्य नाईक यांना उपयोगी पडल्याचे बोलले जात आहे. अजिंक्य नाईक यांचे मूळ गाव कोकणातील परंतु त्याचा जन्म आणि शिक्षण मुंबई मध्येच झाले. त्यांच्या कुटुंबाला राजकीय अशी ओळख नसली तरी १५ वर्षा पूर्वी अजिंक्य नाईक हे मनसेचे युवा पदाधिकारी होते. परंतु नंतर त्यांनी राजकारण सोडून समाजकार्यात



आणि क्रिकेट मध्ये जास्त लक्ष दिले. त्यांचे सासरे पंकज ठाकूर ह्यांनी मुबई क्रिकेट असोशिएशन मध्ये ४ टर्म शरद पवार यांच्या बरोबर काम केले होते. तर शेवटच्या टर्म मध्ये आशिष शेलार अध्यक्ष आणि पंकज ठाकूर उपाध्यक्ष म्हणून निवडून आले होते. त्या दरम्यानच अजिंक्य नाईक यांनी मुबई क्रिकेट संघटनेत प्रवेश केला होता. पंकज ठाकूर यांच्या मार्गदर्शना अजिंक्य यांना मोठा फायदा झाला आहे. वसईचे माजी आमदार आणि बहुजन विकास आघाडीचे सर्वोसर्वा हितेंद्र ठाकूर हे हि अजिंक्य नाईक यांचे चुलत सासरे असून निवडणुकीत ते आपले वजन नाईक यांच्या पारड्यात टाकत आले आहेत, अजिंक्य नाईक यांनी सुरुवातीला अफेक्स बॉडीवर काम केले. त्यानंतर त्यांनी मुंबई क्रिकेट संघटनेचे सचिव म्हणून हि काम केले आहे. संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष अमोल काळे यांच्या आकस्मित निधना नंतर अजिंक्य नाईक हे गेली दीड अध्यक्ष होते . तर आता ते बिनविरोधपणे मुबई क्रिकेट संघटनेच्या आध्यक्षपदी निवडून आले आहेत.